**विकणे आहे**
भेंडा खुर्द, ता. नेवासा
येथील मुख्य गल्लीतील राहण्यास योग्य प्लॉट
योग्य किंमत आल्यास तातडीने विकणे आहे.
संपर्क : +91 9850386599



दैनिक अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिद्ध

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक २०२ I बुधवार ६ मे २०२६
I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com



वेगवान सेवा... विश्वास आमचा!
साईदीप प्रकाशन
श्रीरामपूर-अहिल्यानगर
श्रीरामपूर-संगमनेर
डेली पार्सल सेवा
दररोज पार्सल – वेळेवर, सुरक्षित व खात्रीशीर!
वेळेवर डिलिव्हरी
वेगवान सेवा – वेळेवर पार्सल डिलिव्हरी
सुरक्षित सेवा – आपल्या पार्सलची पूर्ण काळजी
विश्वासार्ह सेवा – ग्राहकांचा विश्वास, आमची ओळख
दररोज सेवा – नियमित व खात्रीशीर पार्सल सेवा

मो. 87667 25308, 70207 44080
आजच संपर्क करा! वेळेवर सेवा, समाधानाची खात्री!
सेवा मार्ग : श्रीरामपूर · अहिल्यानगर · संगमनेर


## महत्त्वाचे..

### लैंगिक शोषण करणाऱ्या नराधमांना पॅरोल बंदी; कॅबिनेट बैठकीत निर्णय

मुंबई : पुण्यातील नसरापूर येथे घडलेल्या साडेतीन वर्षांच्या मुलीवर अत्याचार आणि हत्या प्रकरणावरून संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. या प्रकरणानंतर सर्वत्र संतापाची लाट पसरली आहे. या प्रकरणानंतर लैंगिक शोषण करणाऱ्या नराधमांना पॅरोल देऊ नका, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कॅबिनेट बैठकीत दिले. मंगळवारी मंत्रालयात कॅबिनेट बैठक बोलावण्यात आली होती. यावेळी लैंगिक शोषणातील आरोपींना पॅरोल देऊ नका, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कॅबिनेट बैठकीत दिले आहेत. लैंगिक प्रकरणातील आरोपी हे ८० ते ९० टक्के त्याच गुन्ह्यात अटक होऊन पॅरोलवर सुटलेले असतात आणि त्या काळात ते परत तेच गुन्हे करतात. २०१४ ते २०१९ या काळात देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना अशा गुन्ह्यातील आरोपींना पॅरोल देऊ नका, असा कायदा केला होता. तो २-३ वर्ष अस्तित्वात होता. पण कालांतराने तो न्यायालयाने रद्द केला. आता पुन्हा तसाच कायदा करा, असे निर्देश देवेंद्र फडणवीसांनी विधी व न्याय विभागाला दिले आहेत.

## कल्याण महामार्गावर स्कार्पिओ-बसचा भीषण अपघात...

# नेवासा तालुक्यातील चौघांचा मृत्यू

## दोन चिमुकल्यांसह तिघे गंभीर जखमी

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**मुरबाड : कल्याण– अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावर मुरबाड तालुक्यातील वैशाखरे ते टोकावडे दरम्यान राज्य परिवहन विभागाची बस आणि स्कार्पिओ जीपचा भीषण अपघात झाला. या अपघातात नेवासा तालुक्यातील वडाळा बहिरोबा व भेंडा येथील चौघांचा जागीच मृत्यू झाल्याची माहिती टोकवडे पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक शितल कुमार नाईक यांनी दिली.**



आणखी चौघांची प्रकृती चिंताजनक आहे. अपघातानंतर सकाळी साडेदहा वाजेच्या सुमारास हा अपघात झाला. भीषण अपघातानंतर स्कार्पिओ जीपमधील प्रवासी रस्त्यावर विव्हळत पडल्याचे भीषण दृश्य होते. अपघातग्रस्त जीप नेवासा तालुक्यातील वडाळा बहिरोबा येथील आहे.

जीपमधील अभिषेक भाऊसाहेब मोटे(४०), अविनाश रामचंद्र काकडे(५२), मीना मडके(५१) व निता डुरे (५२) यांचा जागीच मृत्यू झाला. तर आराध्या मोटे(१३), वेदांत मोटे(४), मनीषा कोहक(६५) हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर कल्याण येथील रुग्णालयात उपचार सुरू आहे. अभिषेक मोटे हे आपल्या कुटुंबीयांसह पालघर येथे नातेवाईकांना भेटण्यासाठी निघाले होते. प्रवासादरम्यान अहिल्यानगरहून कल्याणकडे जात असताना समोरून येणाऱ्या बसशी त्यांचा भीषण अपघात झाला. कल्याण ते अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गाच्या रूंदीकरण आणि काँक्रिटीकरणाचे काम सध्या सुरू आहे. या कामामुळे या मार्गावरील वाहतूकीचा वेग वाढला आहे. त्यामुळे अनेकदा लहान मोठे अपघात होत असतात.

१३ एप्रिल रोजी याच महामार्गावर रायते येथील पुलावर एक प्रवासी व्हॅन थेट सिमेंट मिक्सला जाऊन धडकली होती. या भीषण अपघातात तब्बल ११ निष्पाप प्रवाशांना आपला जीव गमवावा लागला होता. यात एकाच कुटुंबातील तीन भावंडांचाही समावेश होता. तर एका शासकीय कर्मचाऱ्याचाही यात जीव गेला होता. या घटनेनंतर या मार्गावरील बेदरकार वाहनांचा प्रश्न ऐरणीवर आला होता.



मिना मडके | निता डुरे | अविनाश काकडे | अभिषेक मोटे

मात्र त्यानंतरही असाच एक अपघात झाला आहे. वैशाखरे ते टोकावडे दरम्यान हा अपघात झाल्याची प्राथमिक माहिती आहे. राज्य परिवहन मंडळाची बस आणि खासगी चारचाकीत हा अपघात झाला असून यात दोघांचा जागीच मृत्यू झाल्याची माहिती तहसिल प्रशासनाने दिली आहे. तर यात आणखी दोघे प्रवासी गंभीररित्या जखमी झाल्याची प्राथमिक माहिती आहे. यातील बस ही कल्याण अहिल्यानगर असा प्रवास करणारी होती. घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी पोलीस आणि स्थानिक प्रवाशांनी धाव घेतली. या चारचाकी वाहनाच्या समोरच्या बाजुचा अक्षरशः चेंदामेंदा झाला (पान ४ वर)

## परमेश्वराच्या अनेक कृपा आपल्यावर होतात



'सहजयोग' भाग ४४

माणसावरती अनेक त्याच्या कृपा होतात. त्याच्या आशीर्वादाने अनेक उत्तम आणि उत्तम असं जीवन त्याला मिळतं, पण मनुष्य मात्र परमेश्वराला प्रत्येक क्षणी विसरत असतो. परमेश्वराने साक्षात ही सर्व पृथ्वी आपल्यासाठी निर्माण केलेली आहे आणि ती पृथ्वी निर्माण करून त्याच्यामध्ये विशेष रूपाने एक स्थान बनवलं आहे, ज्याच्यामुळे ती फार सूर्याच्या जवळ नाही, चंद्रापासून तितकी दर आहे जितकी तिला रहायला पाहिजे. आणि त्या पृथ्वीमध्ये हे जीवजंतू तयार करून आज ते सुंदर दूर कार्य मनुष्य निर्मितीमध्ये फलद्रूप झालेले आहे, म्हणजे आता तुम्ही मानव झालात. आता मानव स्थितीत आल्यावर आपण परमेश्वराला विसरून जावं हे बरोबर नाही. ज्या परमेश्वराने आपल्याला इतकं ऐश्वर्य, सुख आणि शांती दिलेली आहे त्या परमेश्वराला लोक फार लवकर विसरतात, पण ज्या लोकांना परमेश्वराने एवढा आराम दिलेला नाही, जे अजून दारिद्रियात आहेत, दु:खात आहेत, आजारी आहेत, त्रासात आहेत ते मात्र परमेश्वराची आठवण करत राहतात. पण ज्या लोकांना परमेश्वराने दिलेले आहे ते मात्र त्याला विसरून जातात. ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. ज्यांना आशीर्वाद दिला ते मात्र परमेश्वराला साफ विसरून जातात आणि ज्यांना दिला नाही ते मात्र त्याची आठवण काढत राहतात. मग त्याची आठवण केल्यावर, त्यांनाही आशीर्वाद मिळाल्यावर ते ही विसरून जातील. मानवाचं असं विचित्र डोकं आहे की त्याला काहीही दिलेलं झेपतच नाही. म्हणून हे आपण समजलं पाहिजे की सकाळपासून संध्याकाळपर्यंत जर आपण बसून मोजत बसलो की परमेश्वराने सकाळपासून संध्याकाळपर्यंत आपल्याला किती तऱ्हेने आशीर्वादित केलेले आहे तर आपल्याला आश्चर्य वाटेल! आजच माझ्याकडे पुण्यातले पुष्कळ श्रीमंत लोक आले. त्यांच्या घरी किती आजार आहेत, त्या लोकांना किती त्रास आहेत, किती मानसिक त्रास आहेत. कुणाचा मुलगाच दारू पितोय, तर कुणाचा नवराच दारू पितोय, तर कुणाची बायकोच वाया गेलेली आहे अशा रीतीने सर्वांना एवढे प्रश्न आहेत. ३ फेब्रुवारी १९८२ पब्लिक प्रोग्राम राहुरी

अधिक माहितीसाठी www.sahajayogamumbai.org 8871519191
सौजन्य: निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

## खा. निलेश लंके विरुद्ध सोशल मीडियावर पोस्ट...

# तरुणाला कपडे काढून बांधून ठेवले!

### पाच जणांविरुद्ध गुन्हा : आरोपी फरार

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** नगर दक्षिणेचे खा. निलेश लंके यांच्याबाबत सोशल मीडियावर पोस्ट टाकल्याच्या रागातून एका २८ वर्षे तरुणाला कपडे काढून बांधून ठेवून बेदम मारहाण केल्याचा संताप जनक प्रकार नुकताच उघडकीस आला आहे. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना मागील महिन्यात नगर तालुक्यातील चिचोंडी पाटील या गावात घडली होती. या घटनेमुळे नगर तालुक्यासह जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर या गुन्हतील आरोपी फरार झाले असून पोलीस आरोपींच्या कसून शोध घेत आहेत.

याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की, मागील महिन्यात नगर दक्षिणेचे खासदार निलेश लंके यांच्याबाबत सोशल मीडियावर एका २८ वर्षाच्या तरुणाने पोस्ट टाकली होती. याचा मनात राग धरून लंके समर्थक कार्यकर्त्यांनी या तरुणाला खराडी येथून पांढऱ्या रंगाच्या चार चाकी गाडी मध्ये टाकून अपहरण करून नगर तालुक्यातील चिचोंडी पाटील गावातील हरी ओम हॉटेलच्या मागे असलेल्या रूममध्ये डांबून ठेवले होते. यावेळी या तरुणाच्या अंगावरील कपडे काढून बांधून ठेवले. त्यानंतर त्याला लाथाबुक्याने मारहाण करत धमकी देण्यात आली. व त्याच्या जवळील मोबाईल काढून घेऊन त्याला शौचालय साफ करायला लावले. त्यानंतर त्याला लघवी पाजून दबाव आणून अपमान जनक व्हिडिओ काढला. अशी फिर्याद किशोर परभने (रा. बाणखेल)याने नगर तालुका पोलीस ठाण्यात दाखल केली. किशोर परभने (पान ४ वर)

### पश्चिम महाराष्ट्रात उन्हाच्या झळा

## मराठवाडा–विदर्भात 'अवकाळी' गारवा

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**संभाजीनगर :** राज्यात उष्णतेमुळे नागरिक त्रस्त झाले असून ऊन्हापासून बचावासाठी वेगवेगळे पर्याय अवलंबत आहेत. तसेच, भरदुपारी घराबाहेर जाणेही टाळले जात आहे. एकीकडे पश्चिम महाराष्ट्रात कडक उन्हामुळे अंगाची लाहीलाही होत असताना दुसरीकडे मराठवाडा आणि विदर्भात अवकाळी पावसाने हजेरी लावली. काही जिल्ह्यात जोरदार वाऱ्यासह गारांचा पाऊस पडला. जालना, गोंदिया, भंडारा, गडचिरोली, नंदूरबार जिल्ह्यात अवकाळीमुळे वातावरणात गारवा निर्माण झाला आहे. तर, काही ठिकाणी शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले. जालना तालुक्यातील रामनगर परिसरात वादळी वाऱ्यासह पावसाने हजेरी लावल्याने उकाड्यापासून (पान ४ वर)

## शेतकऱ्यांना एकरी २ कोटी रुपये, आणि विमानतळावर नोकरी


प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**विमानतळासाठी पैशांचा पाऊस : ७ मे पासून पैसे वाटप सुरु होणार**

**पुणे :** प्रस्तावित पुरंदर विमानतळाच्या जमीन अधिग्रहणासाठी सरकारने तिजोरी खुली केली आहे. शेतकऱ्यांना प्रति एकर सरासरी दोन कोटी रुपये देण्यात येणार असल्याची घोषणा पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केली. तसेच या प्रकल्पात ज्यांच्या जमिनी गेल्या आहेत त्यांच्या कुटुंबातील एकाला विमानतळावर नोकरी देण्यात येणार आहे. तसेच शेतकऱ्याकडून घेण्यात आलेल्या जमिनीपैकी १० टक्के जमीन विकसित भूखंड शेतकऱ्याला परत केला जाणार असल्याची मोठी घोषणा जिल्हाधिकाऱ्यांनी केली. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी म्हणाले की, पुरंदर विमानतळ जमीन अधिग्रहण शेवटच्या टप्प्यात आलं आहे. पुरंदरमधील सात गावांमध्ये मिळून १,२१६ हेक्टर जमीन तर इतर २४२ एकर जमीन अधिग्रहित करण्यात येणार आहे. या गावांमधील शेतकऱ्यांना (पान ४ वर)

# नेवासा बाजार समितीत आजपासून खुल्या कांदा खरेदी विक्रीला सुरुवात

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री



**नेवासा :** नेवासा बाजार समिती येथे बुधवार, दि. ६ मे रोजी सकाळी ९ वाजता खुल्या कांदा खरेदी विक्रीचा शुभारंभ होणार असून या उपक्रमामुळे नेवासा तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. या कार्यक्रमाचे उदघाटन सदगुरू नारायणगिरी महाराज आश्रमाचे महंत श्री उद्धवजी महाराज मंडलिक नेवासेकर व संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे विश्वस्त वेदांताचार्य देविदास महाराज म्हस्के यांच्या हस्ते व नेवासा बाजार समितीचे मार्गदर्शक माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होत आहे.

नेवासा बाजार समितीत आठवड्यातील प्रत्येक मंगळवार व गुरुवार या दिवशी खुल्या कांदा लिलावाची व्यवस्था करण्यात येणार आहे.तालुक्यातील शेतकऱ्यांनी आपला कांदा विक्रीसाठी नेवासा येथे आणावा असे आवाहन सभापती नंदकुमार पाटील यांनी केले आहे. घोडेगाव येथील कांदा गोणी मार्केटला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाच्या पार्श्वभूमीवर नेवासा येथेही खुल्या कांदा खरेदी-विक्रीचा निर्णय घेण्यात आला आहे. सध्या कांद्याची काढणी सुरू असताना योग्य भाव न मिळाल्याने अनेक शेतकरी जागेवरच माल विक्री करत आहेत. मात्र, अशा शेतकऱ्यांनी खुल्या लिलावासाठी नेवासा बाजार समितीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. नेवासा, भालगाव, गोधेगाव, प्रवरासंगम, सलाबतपूर, जळके, वरखेड, रामडोह, गोगलगाव, गळनिंब, (पान ४ वर)


सस्नेह निमंत्रण!

शेतकऱ्यांचे हित जपणारी संस्था..

**कृषि उत्पन्न बाजार समिती, नेवासा**

नेवासा मुख्य आवार येथे
**खुला कांदा खरेदी विक्रीचा ॥ शुभारंभ ॥**

बुधवार, दि. ६ मे २०२६, सकाळी ९ वाजता

– शुभहस्ते –
महंत उद्धवजी महाराज मंडलिक नेवासेकर – सद्गुरु नारायणगिरीजी महाराज आश्रम, नेवासा बु.।। सुरेगाव गंगा
ह.भ.प. देविदासजी म्हस्के महाराज – श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान, नेवासा

– कार्यक्रमाचे अध्यक्ष –
मा.आ. शंकररावजी गडाख पा.
माजी मंत्री, मृद व जलसंधारण, महाराष्ट्र राज्य

– प्रमुख उपस्थिती –
मा.आ. पांडुरंगजी अभंग – अध्यक्ष, श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान, नेवासा
मा. ॲड. देसाई देशमुख – संचालक, लो.मा.घु.पा. ज्ञानेश्वर सह. सा. कारखाना, भेंडा

व इतर मान्यवरांच्या उपस्थित संपन्न होत असुन या कार्यक्रमास आपण आवर्जुन उपस्थित रहावे ही विनंती!

– विनित –
नंदकुमार पाटील – सभापती | नानासाहेब नवथर – उपसभापती

– संचालक मंडळ –
• हरिश्चंद्र पटारे • अमृत काळे • बाळासाहेब नवले • अरुण शिंदे • अरुण सावंत
• बाबासाहेब आखाडे • बाळासाहेब दहातोंडे • सुनिल धायजे • गणेश भोरे
• दौलतराव देशमुख • संतोष मिसाळ • रमेश मोटे
• सुंदराबाई ढवाण • मिराबाई ढोकणे • संगिता सानप • अश्विनी काळे
देवदत्त पालवे (सचिव) | देविदास घोडेचोर (सहाय्यक निंबधक नेवासा)


मार्गदर्शक
मा.आ. शंकररावजी गडाख पा.

स्थळ – कृषी उत्पन्न बाजार समिती, नेवासा.

## संपादकीय

# पुण्याईने विजयी झालात... आता स्वत:ला सिद्ध करा

बारामती आणि राहुरी विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकांचे निकाल जाहीर होताच महाराष्ट्राच्या राजकीय पटावर एक वेगळीच चित्ररचना उभी राहिली. या दोन्ही निवडणुकांमध्ये केवळ विजय-पराभवाचा प्रश्न नव्हता, तर मतदारांच्या मनोवृत्तीचा, नेतृत्वावरील विश्वासाचा आणि बदलत्या राजकीय समीकरणांचा ठसा स्पष्टपणे उमटला. एका बाजूला बारामतीत भावनिक वातावरण आणि औपचारिक निवडणूक दिसली, तर दुसरीकडे राहुरीत बहुकोनी लढत आणि स्पष्ट राजकीय संघर्ष पाहायला मिळाला.

बारामती ही केवळ एक मतदारसंघ नाही, तर ती महाराष्ट्राच्या राजकारणातील एक प्रभावशाली केंद्रबिंदू आहे. येथे झालेली पोटनिवडणूक ही प्रत्यक्षात औपचारिकता वाटावी अशीच होती. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या विजयाने हा अंदाज खरा ठरला. विरोधकांकडून ठोस उमेदवार न देणे, तसेच काही स्वतंत्र उमेदवारांना मतदारांनी पूर्णतः नाकारणे, हे बारामतीकरांनी घेतलेले स्पष्ट राजकीय भूमिकेचे उदाहरण म्हणावे लागेल. या निवडणुकीत मतदारांनी केवळ मतदान केले नाही, तर त्यांनी एका राजकीय वारशाला मानाचा मुजरा दिला.

मात्र, या विजयाच्या पार्श्वभूमीवर एक वेगळीच गोष्ट प्रकर्षाने जाणवलीबारामतीत कुठेही जल्लोष नव्हता. याचे कारण म्हणजे अजित पवार यांच्या अनुपस्थितीचे दुःख अजूनही मतदारांच्या मनात दाटलेले आहे. त्यामुळेच हा विजय जितका मोठा, तितकाच तो संयमित आणि भावनिकही ठरला. या घटनेतून हे स्पष्ट होते की, राजकारणात केवळ सत्ता आणि विजयच महत्त्वाचे नसतात, तर भावना आणि नातेसंबंधही तेवढेच निर्णायक असतात.

दुसरीकडे, राहुरी विधानसभा मतदारसंघात चित्र पूर्णतः वेगळे होते. येथे निवडणूक ही खऱ्या अर्थाने बहुकोनी आणि संघर्षपूर्ण होती. महायुतीच्या एकजुटीमुळे अक्षय कर्डिले यांना स्पष्ट आघाडी मिळाली. मुख्यमंत्री, वरिष्ठ नेते आणि स्थानिक पातळीवरील समन्वयामुळे विरोधकांची मांडणी कोलमडली. माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी विरोध बाजूला ठेवत दिलेला पाठिंबा हा या निवडणुकीतील निर्णायक टप्पा ठरला.

राहुरीत विरोधकांनी ऐनवेळी उमेदवार उभा करत राजकीय समीकरण बदलण्याचा प्रयत्न केला. मात्र, गोविंद मोकाटे यांना मिळालेला पराभव हा केवळ एका उमेदवाराचा पराभव नव्हता, तर तो एका राजकीय गणिताच्या अपयशाचे प्रतीक होता. शरद पवार यांच्याबाबत एक समज प्रचलित आहेत्यांचा स्पर्श झाला की राजकारणात यश मिळते. मात्र या निवडणुकीत हा समज पूर्णतः खोटा ठरला. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, आजच्या काळात केवळ मोठ्या नेत्याचा पाठिंबा पुरेसा नाही; स्वतःची प्रतिमा, कामगिरी आणि जनसंपर्क हेच यशाचे खरे मापदंड ठरत आहेत.

बारामती आणि राहुरी या दोन्ही मतदारसंघांमध्ये एक समान धागा दिसून आलाविरोधकांची डिपॉझिट जप्त झाली. याचा अर्थ केवळ विजय नव्हे, तर मतदारांचा स्पष्ट आणि एकतर्फी कौल आहे. मतदार आता गोंधळात नाहीत; ते ठामपणे निर्णय घेत आहेत आणि त्यानुसार मतदान करत आहेत.

आता प्रश्न आहे तो पुढील वाटचालीचा. सुनेत्रा पवार यांच्यासमोर आव्हाने वेगळी आहेत. त्यांना मोठा राजकीय वारसा लाभला असला, तरी त्या वारशाचे ओझेही तेवढेच मोठे आहे. बारामतीसारख्या मतदारसंघात अपेक्षा उंचावलेल्या असतात. विकासकामांची गती, जनतेशी संवाद आणि नेतृत्वाची सातत्यपूर्ण उपस्थिती या बाबींची कसोटी लागणार आहे. त्यांच्या विजयाने औपचारिकता पूर्ण झाली असली, तरी आता खरी परीक्षा सुरू होणार आहे.

अक्षय कर्डिले यांच्यासाठी ही निवडणूक एक संधी आहेस्वतःला सिद्ध करण्याची. वडिलांच्या नावाचा आधार मिळाला असला, तरी पुढील प्रवास स्वतःच्या कर्तृत्वावरच ठरणार आहे. राहुरीसारखा विस्तीर्ण आणि राजकीयदृष्ट्या गुंतागुंतीचा मतदारसंघ हाताळणे हे सोपे नाही. येथील मतदार जागरूक आहेत आणि ते कामगिरीवरच नेत्यांचे मूल्यमापन करतात. त्यामुळे कर्डिले यांना विकासकामे, संघटन बांधणी आणि सर्वसमावेशक नेतृत्व यावर भर द्यावा लागेल.

यामध्ये त्यांना राधाकृष्ण विखे पाटील आणि संग्राम जगताप यांसारख्या अनुभवी नेत्यांचे मार्गदर्शन मिळणार आहे. मात्र, शेवटी मैदानात उतरून स्वतःची छाप उमटवणे हे त्यांनाच करावे लागेल. राहुरीने अनेक नेत्यांना घडवले, तर अनेकांना नाकारलेही आहे. त्यामुळे हा मतदारसंघ कर्डिले यांच्यासाठी एक मोठी परीक्षा ठरणार आहे.

या दोन्ही निवडणुकांमधून एक व्यापक संदेश पुढे येतो. राजकारण बदलत आहे. घराणेशाही, मोठे नेते आणि पारंपरिक समीकरणे यांची जागा आता कामगिरी, प्रतिमा आणि जनसंपर्क घेत आहेत. मतदार अधिक सजग झाला आहे आणि तो भावनांबरोबरच वास्तवाचाही विचार करत आहे.

शेवटी, बारामती आणि राहुरी या दोन वेगळ्या कथा सांगतात. एक परंपरेची आणि दुसरी संघर्षाची. पण या दोन्ही कथांचा शेवट एकाच निष्कर्षाकडे घेऊन जातो. राजकारणात टिकायचे असेल, तर स्वतःला सिद्ध करणे अपरिहार्य आहे.

# चिमुकलीच्या मारेकऱ्यास फाशीची शिक्षा द्यावी

## ब्राह्मण समाजाची मागणी



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** नसरापूर (जि. पुणे) येथे चार वर्षीय बालिकेवर लैंगिक अत्याचार करून तिची दगडाने ठेचून हत्या केल्याच्या अमानुष घटनेचा श्रीरामपूर तालुका ब्राह्मण समाजातर्फे तीव्र निषेध करण्यात आला. या प्रकरणातील आरोपीस फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी ठाम मागणी समाजाच्या वतीने करण्यात आली.

यासंदर्भात अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे तसेच श्रीरामपूर तहसीलदार मिलिंदकुमार वाघ यांना ब्राह्मण सेवा संघ व ब्राह्मण युवा संघ, श्रीरामपूर यांच्या वतीने निवेदन देण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, संबंधित आरोपी यापूर्वीही अशाच प्रकारच्या लैंगिक गुन्ह्यात सहभागी असल्याचे समोर आले असून तुरुंगातून बाहेर आल्यानंतर त्याने पुन्हा हा गंभीर गुन्हा केल्याचे समजते. त्यामुळे समाजात आरोपीविरोधात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

समाजातर्फे करण्यात आलेल्या प्रमुख मागण्यांमध्ये हा गुन्हा फास्ट ट्रॅक न्यायालयात चालवून आरोपीस फाशीची शिक्षा द्यावी, न्यायालयात सरकारी पक्षाची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी उज्ज्वल निकम किंवा तत्सम अनुभवी वकिलाची नियुक्ती करावी, अहिल्यानगर पोलीस हद्दीतील शाळा, महाविद्यालये व महत्त्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, तसेच नियमित पोलीस गस्त वाढवावी, अशा मागण्यांचा समावेश आहे.

तसेच महिला अत्याचार विरोधातील शक्ती कायदा तातडीने लागू करण्यात यावा, अशीही मागणी करण्यात आली.

यावेळी भगवंत कुलकर्णी, उमेश कुलकर्णी, सुबोध शेवतेकर, प्रतिक वैद्य, के. टी. जोशी, नवनीत जोशी, महेश टंकसाळे, चंद्रशेखर कुलकर्णी, संजय पुराणिक, गणेश जोशी, श्रीकांत शेटे, आदिनाथ जोशी, सुभाष आंबेकर, दीपक देशपांडे, प्रशांत सारोळकर, कपिल काळे, शुभम काळे, स्वप्निल जोशी, किशोर कुलकर्णी, रुद्रप्रताप कुलकर्णी, यशवंत कुलकर्णी, सुशांत कुलकर्णी, दत्तात्रय कुलकर्णी, उदय कुलकर्णी, सुहास याडकीकर आदी समाजबांधव उपस्थित होते.

# बेलापूर रोडवरील महानुभव आश्रमात 'अमृतफल उपहार'

## महोत्सवाची जय्यत तयारी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** शहरातील बेलापूर रोडवरील महानुभव आश्रमात श्रीकृष्ण मंदिराचा वर्धापन दिन आणि कवीश्वर कुलभूषण महंत श्रीपंत बाबा पिढी अंतर्गत 'अमृतफल उपहार' महोत्सव शुक्रवार, दि. ८ मे रोजी भक्तिमय वातावरणात साजरा होणार आहे. आश्रमाचे प्रमुख महंत मोहित पंत बाबा यांनी ही माहिती दिली. सन १९४९ मध्ये स्थापन झालेल्या या आश्रमाने महानुभाव पंथाच्या धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक परंपरा जपण्याचे कार्य सातत्याने केले आहे. अनेक महंतांच्या मार्गदर्शनातून समृद्ध झालेल्या या आश्रमाची परंपरा आजही जोमाने सुरू असून, महंत मोहित पंत बाबा यांच्या नेतृत्वाखाली विविध धार्मिक उपक्रम राबवले जात आहेत. महोत्सवाची सुरुवात पहाटे ५ वाजता श्रीमूर्तींच्या मंगल स्नानाने होणार आहे. सकाळी ७ ते ८ या वेळेत श्रीमद् भगवद्गीतेचे पारायण, सकाळी ८ वाजता शोभायात्रा, तर सकाळी ९.३० वाजता ध्वजारोहण व ईश्वरार्चन करण्यात येणार आहे. यानंतर सकाळी १०.३० वाजता स्वागत समारंभ व धर्मसभेचे आयोजन करण्यात आले असून, महानुभाव पंथातील संत-महंतांचे प्रवचन, कीर्तन आणि प्रबोधनपर मार्गदर्शन होणार आहे. दुपारी १२.३० वाजता प्रसाद भोजनाने कार्यक्रमाची सांगता होईल. या भक्तिमय आणि आध्यात्मिक सोहळ्यास भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आश्रम प्रशासनाने केले आहे.

# कौशल्य शिक्षणावर प्रवरेचा भर : डॉ. सुस्मिता विखे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लोणी, :** पदवी शिक्षणाबरोबरच आज कौशल्याधारित शिक्षणाची गरज मोठ्या प्रमाणात निर्माण झाली असून, प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत विविध कौशल्ये प्रदान करत आहे. कौशल्याधारित शिक्षणावर विशेष भर देण्यात येत असून, यासाठी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे नेहमीच प्रयत्नशील असल्याचे प्रतिपादन संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांनी केले. पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे यांच्या ९४ व्या जयंतीनिमित्त जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अहिल्यानगर आणि प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या संयुक्त विद्यमाने, टोयोटा किर्लोस्कर प्रा. लि. यांच्या सहकार्याने लोणी येथील पद्मश्री विखे महाविद्यालयात आयोजित दोन दिवसीय रोजगार मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. डॉ. विखे म्हणाल्या, औद्योगिक क्षेत्राला कुशल मनुष्यबळाची मोठी गरज आहे. पदवी शिक्षणासोबत विद्यार्थ्यांना व्यावहारिक कौशल्ये मिळणे आवश्यक आहे. याच उद्देशाने प्रवरा शैक्षणिक संकुल विविध कंपन्यांशी सामंजस्य करार करून ग्रामीण विद्यार्थ्यांना कौशल्याधारित प्रशिक्षण देत आहे. आज रोजगाराच्या संधी उपलब्ध असल्या तरी कुशल मनुष्यबळाच्या अभावामुळे त्या पूर्णपणे भरल्या जात नाहीत. ही दरी भरून काढण्यासाठी प्रवरा संस्था पुढाकार घेत असून विद्यार्थ्यांना उद्योगक्षेत्रासाठी तयार करण्याचे कार्य करत आहे, असेही त्यांनी सांगितले. यावेळी सहाय्यक आयुक्त योगेश उगले म्हणाले की, अहिल्यानगर जिल्ह्यात औद्योगिकीकरण वेगाने वाढत आहे. विविध कंपन्या जिल्ह्यात येत असून, त्या उद्योगांना आवश्यक मनुष्यबळ तयार करण्याचे कार्य प्रवरा संस्थेमार्फत होत आहे. कार्यक्रमास समन्वयक अमोल घोलप, रणजीत पाटील, गोविंद डाळिंबकर, डॉ. प्रदीप दिघे, सौ. लीलावती सरोदे, डॉ. आर. ए. पवार, डॉ. महेश खर्डे, अर्जुन आहेर आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. शांताराम चौधरी यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. प्रदीप दिघे यांनी केले.

# डाकले महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर:** येथील डाकले महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांसह शिक्षकांचा यावेळी सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय कांबळे यांनी प्रास्ताविक करत महाविद्यालयाच्या विकासाचा आढावा घेत समाधान व्यक्त केले. कार्यक्रमासाठी बोरावके महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रवीण बडदे तसेच शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद पोंधे प्रमुख उपस्थित होते.

कार्याध्यक्ष डॉ. पौर्णिमा गुजर यांनी वार्षिक अहवाल सादर करत महाविद्यालयाच्या प्रगतीची माहिती दिली. प्रमुख पाहुणे प्रा. संभाजी पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाबरोबरच कला व क्रीडा क्षेत्राचे महत्त्व अधोरेखित केले. शिस्त, सातत्य आणि कठोर परिश्रम ही यशाची गुरुकिल्ली असल्याचे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरित केले. भारतीय संगीत हे जगातील श्रेष्ठ संगीत असून संगीताच्या अध्ययनातून मनःशांती लाभते, असे मत त्यांनी व्यक्त केले. त्यांनी सादर केलेल्या रयत गीतासह अन्य रचनांनी सभागृह भारावून गेले. अहवालाचे वाचन शारीरिक शिक्षण संचालक प्रा. सुभाष देशमुख व डॉ. मंगल घोलप यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. मंगल घोलप यांनी तर आभार तृप्ती हारदे-कोरडे यांनी मानले. प्रा. प्रतिभा शेटे यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. कार्यक्रमास उपप्राचार्य प्रो. डॉ. सादिक सय्यद, डॉ. अनिकेत खत्री, प्रा. योगीराज चंद्रात्रे, श्री. विजय दळवी, डॉ. प्रदीप यादव, प्रा. विजय नागपुरे, प्रा. सचिन कुलकर्णी, प्रा. मयुरी जेजुरकर, प्रा. सारिका पेरणे, प्रा. अजय गायकवाड यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विश्व हिंदू परिषदेच्या श्रीरामपूर शहर संयोजकपदी सचिन वायकर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दल यांच्या संयुक्त विद्यमाने संघटनात्मक फेररचना करण्यात आली असून श्रीरामपूर शहर संयोजक म्हणून सचिन वायकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



हिंदुत्वाप्रती असलेली त्यांची निष्ठा आणि सामाजिक कार्याची ओढ लक्षात घेऊन बजरंग दलाचे पश्चिम महाराष्ट्र गोरक्षा प्रमुख ऋषिकेश भागवत व हिंदू परिषद जिल्हा विशेष संपर्क प्रमुख योगेश मखाना यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवड करण्यात आली. संघटनेच्या माध्यमातून हिंदू हिताचे रक्षण करणे आणि तरुणांमध्ये राष्ट्रभक्तीची भावना जागृत करणे ही माझी प्राथमिकता राहील, असे प्रतिपादन नवनियुक्त शहर संयोजक सचिन वायकर यांनी यावेळी व्यक्त केले. या निवडीबद्दल त्यांचे सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदन होत आहे

# मेजर तांबे यांचा गोंडेगावात सन्मान

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**गोंडेगाव :** श्रीरामपूर तालुक्यातील गोंडेगावचे भुमीपूत्र जवान सोमनाथ भिमराज तांबे हे नुकतेच प्रदीर्घ काळातील लष्करी सेवेनंतर ते सेवानिवृत्त झाले.सेवानिवृत्त झाल्यानतर ते आपल्या जन्मभूमीत आल्यानतर गावातील गावकरी मंडळानी व मित्र परिवाराने सवाद्य मिरवणूक काढून त्यांच्यावर पुष्पवृष्टी करत त्यांची मिरवणूक काढण्यात आली.




यावेळी हनुमान मंदिरात झालेल्या भव्य सेवापूर्ती कार्यक्रमात त्यांचा ग्रामस्थांनी सपत्नीक सत्कार केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भागवतराव तांबे होते. याप्रसंगी, अर्थ व बांधकाम समितीचे माजी सभापती बाबासाहेब दिघे,पोलिस निरीक्षक अरुण धनवडे, प्रशासक सरपंच सागर बढे आदी मान्यवर उपस्थित होते.मेजर तांबे यांचा विविध राजकीय,सामाजिक संघटनांसह ग्रामस्थांनी नागरी सत्कार झाला.सेवानिवृत्त जवान मेजर अशोक आमले, कर्नाल सुनिल आमले,विजय फोपसे मनोगत व्यक्त केले.सत्कारप्रसंगी बोलताना दिघे म्हणाले की, जन्मभूमी सोडून मातृभूमीची सेवा व त्यामागे कष्ट, परिश्रम, त्याग,महत्वाचा आहे. घरची परिस्थिती तशी बेताची, कुटुंबियांच्या पाठिंब्यामुळेच इतकी वर्षे मातृभूमीची प्रामाणिकपणे सेवा केली.युवकांना मेजर तांबे यांच्याकडून शिकवण मिळेल,असा विश्वास बाबासाहेब दिघे यांनी सागितले. सुत्रसंचालन माजी सरपंच संभाजी बढे यांनी केले तर, दिंगबर तांबे यांनी आभार मानले.

# द्रोणा संस्थेत दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** राहाता तालुक्यातील साकुरी येथील अशोकराव दामोधर दंडवते पाटील ग्रामीण शैक्षणिक प्रतिष्ठानच्या द्रोणा स्कूल व कॉलेजमध्ये इयत्ता दहावी व इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ कार्यक्रम थाटात संपन्न झाला.



यावेळी संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष जयराज दंडवते,संस्थेच्या संचालिका प्राजक्ताताई दंडवते ,संस्थेचे उपाध्यक्ष अनुप दंडवते, प्राचार्या अनिता रोहोम शिक्षक, शिक्षिका यांनी इयत्ता दहावी व इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षेसाठी व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष जयराज दंडवते, संचालिका प्राजक्ताताई दंडवते यांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले.यावेळेस विद्यार्थ्यांनी काही खेळ दाखवले. तसेच विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणामध्ये गुरु बद्दल भावना व्यक्त केल्या तसेच शाळा व शिक्षक यांचा आम्हा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वात कसा बदल होत गेला याबद्दल त्यांनी मनोगत व्यक्त करत शिक्षणाला पुन्हा उजाळा यावेळेस त्यांनी दिला.

निरोप समारंभाची पूर्ण तयारी इयत्ता नववीतील विद्यार्थ्यांनी केली होती.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष जयराज दंडवते म्हणाले, विद्यार्थ्यांनी आपले ध्येय व उद्दिष्ट सिद्ध केले पाहिजे. कोणत्याही कार्यामध्ये जर यश संपादन करायचं असेल तर प्रत्येकाला मेहनत करावी लागते. मेहनतीच्या जोरावर कुठलेही यश संपादन होत नाही. त्यासाठी तुम्हाला खूप अभ्यास करून चांगले मार्क मिळवून तुमचं पुढचं आयुष्य व्यवस्थितपणे जगता येईल. व सर्व विद्यार्थ्यांना बोर्ड पेपर साठी शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविक प्राचार्या अनिता रोहोम यांनी केले व विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. नववीतील विद्यार्थ्यांनी राजनंदिनी जाधव हिने सर्वांचे आभार मानले. सूत्रसंचालन विद्यार्थ्यांनी सानवी भोंगळे हिने केले.

# धारणगाव-कोपरगाव रस्त्यावरचे खड्डे बुजवा : इम्तियाज अत्तार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी :** कोपरगाव शहरातील अत्यंत महत्वाच्या असलेल्या प्रभाग क्रमांक ०८ मधील निकृष्ठ दर्जाच्या झालेल्या धारणगाव-कोपरगाव रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडल्यामुळे छोटे-मोठे अपघात होत असून दुर्दैवाने जर अपघातात एखाद्या निरपराध व्यक्तींचा बळी जावू शकतो त्यामुळे धारणगाव-कोपरगाव रस्त्यावरील खड्डे तातडीने बुजवा अन्यथा राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या वतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन केले जाईल असा ईशारा राष्ट्रवादीचे नगरसेवक इम्तियाज अत्तार यांनी कोपरगाव नगरपरिषदेला दिला आहे. कोपरगाव शहरातील संजय नगर, सुभाष नगर, टिळक नगर परिसरातील अत्यंत महत्वाचा आणि गजबजलेला रस्ता म्हणून धारणगाव-कोपरगाव रस्त्याकडे पाहिले जाते.कोपरगाव शहरातील मुख्य रस्ता असल्यामुळे या रस्त्यावर वाहनांची व नागरिकांची मोठी वर्दळ असते.या रस्त्यावरच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक असून या स्मारकाच्या समोर देखील खड्डे पडलेले आहेत. ह्या रस्त्यासाठी आमदार आशुतोष काळे यांनी दोन कोटी निधी दिला असून या रस्त्याचे काम सत्ताधारी गटातील एका नगरसेवकाने आपल्या हस्तकाकरवी केले असून करण्यात आलेले काम अतिशय निकृष्ट दर्जाचे करण्यात आले आहे.



त्यामुळे काम होवून काही दिवसातच या रस्त्यावर खड्डे पडण्यास सुरुवात झाली होती त्यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या वतीने या निकृष्ठ दर्जाच्या कामाबाबत कोपरगाव नगरपरिषदेला विचारणा देखील करण्यात आली होती. परंतु कोपरगाव नगरपरिषदेने त्याची दखल घेतली नाही व आता तर ज्यांनी या रस्त्याचे काम घेतले होते तेच सत्तेत जावून बसले आहेत त्यामुळे या निकृष्ठ दर्जाच्या रस्त्याची चौकशी होईल याची आशा कोपरगावच्या नागरीकांनी सोडलेली आहे. परतू कमीत कमी या रस्त्यावर पडलेले खड्डे तरी बुजवावे अशी माफक अपेक्षा कोपरगावच्या जनतेच्या वतीने नगरसेवक इम्तियाज अत्तार यांनी कोपरगाव नगरपरिषदेकडे केली आहे. मागील पावसाळ्यात याच खड्ड्यात साचलेल्या पाण्यात कागदी होड्या सोडून आंदोलन करणारे आता सत्तेत आहेत. राष्ट्रवादीच्या नगरसेवकांच्या प्रभागातील विकासकामांना निधी देण्यात दुजाभाव करून आमची जिरवण्याच्या नादात कोपरगावच्या जनतेची जिरवू नका आणि धारणगाव-कोपरगाव रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांमध्ये अपघात होवून एखाद्या निरपराध नागरीकाचा जीव जायची वाट न पाहता तातडीने खड्डे बुजवा अन्यथा तीव्र स्वरूपाचे आंदोलन केले जाईल असा ईशारा राष्ट्रवादीचे नगरसेवक इम्तियाज अत्तार यांनी कोपरगाव नगरपरिषदेला दिला आहे.

# ट्रॅक्टरच्या व्यवहारात सहा लाखांची फसवणूक दोघां विरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** ट्रॅक्टर खरेदीच्या व्यवहारात सहा लाख रुपयांची फसवणूक झाल्याची घटना उघडकीस आली असून या प्रकरणी दोन जणां विरुद्ध राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या घटने बाबत नितीन भाऊसाहेब कदम (वय ३२, रा. धामोरी खुर्द, ता. राहुरी जि. अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, सन २०२४ मध्ये शेती कामाच्या निमित्ताने त्यांची ओळख इंद्रभान गोविंद शेंडगे (रा. गोणेगाव, ता. नेवासा) याच्याशी झाली. त्यानंतर शेंडगे यांनी त्यांची ओळख चंद्रकांत तुकाराम लांडे (रा. सोनई, ता. नेवासा) याच्याशी करून दिली.

नवीन व्यवसायासाठी ट्रॅक्टर खरेदी करण्याच्या उद्देशाने कदम यांनी 'जॉन डिअर इंडिया प्रा. लि.' कंपनीचा एम एच १७ डीसी १४३५ क्रमांकाचा ट्रॅक्टर व इन्फिल्टर औजारासह १० लाख रुपयांत खरेदी करण्याचा व्यवहार ठरवला. त्यानुसार १७ डिसेंबर २०२४ रोजी नोटरी करण्यात आली. यावेळी कदम यांनी आरोपींना तीन लाख रुपये रोख व तीन लाख रुपये धनादेशाद्रे असे एकूण सहा लाख रुपये दिले.

ठरल्याप्रमाणे सहा महिन्यांत ट्रॅक्टर नील करून देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, वारंवार मुदत घेऊनही आरोपींनी ट्रॅक्टर न देता टाळाटाळ केली. तसेच ट्रॅक्टर साखर कारखान्यावर कामासाठी लावल्याचे सांगून विश्वासात घेतल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. शेवटी आपली आर्थिक फसवणूक झाल्याची खात्री झाल्यानंतर कदम यांनी राहुरी पोलीस ठाण्यात तक्रार दिली. या प्रकरणी आरोपी १) चंद्रकांत तुकाराम लांडे (रा. सोनई, ता. नेवासा) व २) इंद्रभान गोविंद शेंडगे (रा. गोणेगाव, ता. नेवासा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# जनगणनेसाठी नेवासा तालुक्यातील प्रशासकीय यंत्रणा सज्ज : डॉ. बिरादार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** राष्ट्रीय जनगणना मोहिमेसाठी नेवासा तालुक्यातील प्रशासकीय यंत्रणा पूर्णपणे सज्ज झाली असून घराघरातील माहिती संकलनासाठी व्यापक तयारी करण्यात आली असून दि.१६ मे पासुन प्रत्यक्ष घरगुती जनगणना सुरू होणार असल्याची माहिती नेवासा तालुक्याचे तहसीलदार डॉ.संजय बिरादार यांनी दिली.तहसीलदार डॉ. संजय बिरादार,अप्पर तहसिलदार श्रीमती सोनाली मात्रे,नगरपंचायतीचे मुख्याधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात येत आहे.



नगरपंचायत हद्दीसह नेवासा तालुक्यातील सर्व गावांमध्ये घरांची सविस्तर माहिती गोळा करण्यासाठी एकूण ६१९ प्रगणकांची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर प्रगणक व पर्यवेक्षक यांचे प्रशिक्षण दि.२७ एप्रिल पासून सुरू झाले असुन. पहिल्या टप्प्यात २५० प्रगणकांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. एकूण तीन टप्प्यांत ३ दिवसांचे सविस्तर प्रशिक्षण दिले जाणार आहे.


दि.१ मे ते १५ मे पर्यंत स्वगणनेस सुरुवात झाली असुन १६ मे पासुन प्रत्यक्ष घरगुती जनगणना सुरू होणार असून नागरिकांनी प्रगणकांना अचूक व संपूर्ण माहिती देवून सहकार्य करावे असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. या मोहिमेसाठी जिल्हाधिकारी मुख्य जनगणना अधिकारी म्हणून काम पाहणार आहेत तर ग्रामीण भागासाठी तहसीलदार आणि शहरासाठी मुख्याधिकारी चार्ज अधिकारी म्हणून कार्यभार सांभाळणार आहे. प्रगणकांच्या कामावर देखरेख ठेवण्यासाठी ६ प्रगणकांमागे १ पर्यवेक्षक अशा पद्धतीने एकूण१०५ पर्यवेक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

प्रत्येक प्रगणकाला सुमारे १८० ते २०० घरे किंवा अंदाजे ७०० ते ८०० लोकसंख्येची माहिती संकलित करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. तरी दि.१ मे ते दि.१५ मे पर्यंत जास्तीस जास्त नागरीकांनी स्वगणना करण्याचे आवाहन तहसीलदार डॉ. संजय बिरादार व अप्पर तहसिलदार श्रीमती. सोनाली म्हात्रे तसेच नगरपंचायतीचे मुख्याधिकारी यांनी केले आहे.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द•ख•ल

## ज्ञानसागर करिअर केअर सेलचा बारावीचा १०० टक्के निकाल



**लोणी** : बारावी (व्हड्ड) बोर्डाच्या निकालात लोणी येथील ज्ञानसागर करिअर केअर सेलने १०० टक्के निकालाची उल्लेखनीय कामगिरी नोंदवली. या निकालातील विशेष बाब म्हणजे ज्ञानसागर क्लासेसचा विद्यार्थी अभिषेक अनिल खंडागळे याने ९२.१७ टक्के गुण मिळवत राहाता तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला. त्याने गणित विषयात १०० पैकी १०० गुण, तर फिजिक्स व केमिस्ट्रीमध्ये प्रत्येकी ९३ गुण मिळवले.

तसेच गएए चरळपी परीक्षेत ९३.६७ पर्सेंटाइल मिळवत जिल्ह्याचे नाव उज्ज्वल केले. श्रेयनिहाय यशामध्ये श्रेयश विलास पगार (८७.६७ टक्के) द्वितीय, तर तेजस प्रदीप अंत्रे (८७.५० टक्के) तृतीय क्रमांकावर राहिले. या विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण परिश्रमातून दैदीप्यमान यश मिळवले. या यशामागे गणिताचे प्रा. खडके सर, फिजिक्सचे प्रा. प्रकाश द्विवेदी, केमिस्ट्रीचे प्रा. तिवारी, बायोलॉजीचे प्रा. संयम दिमान यांचे मार्गदर्शन लाभले. संचालक प्रा. नारायण शिनगारे सर व वायबसे सर यांच्या अचूक नियोजनामुळे ही यशस्वी परंपरा कायम असल्याचे सांगण्यात आले.

## लोणी प्रवरा अभिमत विद्यापीठाचा शुक्रवारी पदवीप्रदान समारंभ

**लोणी** : प्रवरा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस या अभिमत विद्यापीठाचा पदवीप्रदान समारंभ शुक्रवार, दि. ८ मे रोजी सकाळी १० वाजता प्रवरा अभिमत विद्यापीठाच्या मैदानावर आयोजित करण्यात आला असल्याची माहिती विद्यापीठाचे कुलपती डॉ. राजेंद्र विखे पाटील यांनी दिली. या समारंभास किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेडचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक संजय किर्लोस्कर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. विशेष अतिथी म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्रवरा अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विष्णू मगरे, विश्वस्त ध्रुव विखे पाटील तसेच कुलसचिव डॉ. रवींद्र लावरे उपस्थित राहणार आहेत.

यावेळी डॉ. बाळासाहेब विखे पाटील ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय, ग्रामीण दंत महाविद्यालय, डॉ. एपीजे अब्दुल कलाम फिजिओथेरपी महाविद्यालय, श्रीमती सिंधुताई एकनाथराव विखे पाटील नर्सिंग कॉलेज, बायोसायन्स अँड टेक्नॉलॉजी कॉलेज तसेच स्कूल ऑफ पब्लिक हेल्थ अँड सोशल मेडिसिन येथील एकूण ३२२ विद्यार्थ्यांना पदवी, तर ३ विद्यार्थ्यांना पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात येणार आहे. विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना सुवर्णपदके देऊन गौरविण्यात येणार आहे. या समारंभास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## विद्यार्थी-शिक्षकांच्या अविरत प्रयत्नांतून सह्याद्रीची यशोगाथा : डॉ. सुधीर तांबे



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : इयत्ता बारावीच्या बोर्ड परीक्षेचा निकाल जाहीर होताच सह्याद्री ज्युनिअर कॉलेज, संगमनेरने पुन्हा एकदा गुणवत्तेची छाप उमटवली. गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात डॉ. सुधीर तांबे बोलत होते. यंदा सार्थक बिबवे याने विज्ञान शाखेत, तर शुभांगी गौतम हिने कला शाखेत तालुक्यात प्रथम क्रमांक मिळविला. तसेच भौतिकशास्त्र विषयात सार्थक बिबवे राज्यात प्रथम आला, तर गणित विषयात सार्थक बिबवे आणि तेजस अभंग यांनी राज्यात अव्वल स्थान पटकावले. विविध विषयांत ९० पेक्षा अधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या १३० पेक्षा अधिक आहे.डॉ. तांबे म्हणाले, यश हे योगायोगाने मिळत नाही.

सातत्यपूर्ण परिश्रम, अभ्यासातील शिस्त आणि मानसिक स्थैर्य यामुळेच यश संपादन करता येते. दोन वर्षांच्या प्रयत्नांनंतर मिळणारे यश विद्यार्थ्यांच्या भवितव्याची भक्कम पायाभरणी करते. माजी नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे यांनी संस्थेच्या कार्यपद्धतीचे कौतुक केले. संचालक बाबा खरात यांनी विद्यार्थ्यांच्या यशाचे श्रेय पालक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या चिकाटीला दिले. प्राचार्य खेमनर एस. एम. यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमास चेतन मुर्तडक, संजय सुरसे, भास्कर कुटे, शिक्षकवर्ग, कर्मचारी, विद्यार्थी व पालक उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. गणेश गुंजाळ व प्रा. नवनाथ गुंड यांनी केले, तर आभार प्रा. एस. पी. सुरसे यांनी मानले.

# जनगणना कागद पेन वापरात न आणता डिजिटल पद्धतीने होणार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : राहुरी शहर एम सी एल जनगणना मोहीमेसाठी ७० प्रगनक व पर्यवेक्षक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यासाठी राहुरी नगरपरिषदेच्या डॉ दादासाहेब तनपुरे सभागृहात जनगणनेच्या प्रशिक्षणाचा दुसरा टप्पा सुरू झाला आहे. देशाच्या भविष्यासाठी विकासाचा पाया ठरणारी जनगणना मोहीम आता सर्वत्र जलद गतीने सुरू आहे.



राहुरी शहर नगरपरिषद हद्दीतील जनगणनेसाठी प्रशासनाने कंबर कसली असून एकूण ७० प्रगनक व परीक्षक यांची नियुक्ती करण्यात आली आहे विशेष म्हणजे यंदाची ही पारंपरिक कागद पेन ऐवजी पूर्णपणे डिजिटल पद्धतीने होणार असल्याने याची माहिती अधिक अचूक व वेगाने मिळणार आहे. प्रशिक्षणासाठी पहिली बॅच २६ एप्रिल ते २८ एप्रिल २०२६ व दुसरी बॅच ४ मे ते ६ मे २०२६ पर्यंत एकूण सहा दिवस प्रशिक्षण प्रशिक्षण डॉ. दादासाहेब तनपुरे सभागृह राहुरी नगरपरिषद राहुरी येथे पार पडणार असल्याची माहिती मुख्याधिकारी अभिजीत हराळे यांनी दिली शहरातील एकूण १२ प्रभागाची जबाबदारी ही प्रगणकावर असेल प्रत्येक घरापर्यंत पोहचून माहिती संकलित करणार आहेत.

सदर जनगणना संदर्भात विविध काम करण्याच्या सूचना अध्यक्ष भाऊसाहेब मोरे सर व माजी खासदार प्रसाद तनपुरे,गट नेते हर्ष तनपुरे,उपाध्यक्ष गजानन सातभाई, विरोधी पक्ष नेते अरुण साळवे, तसेच नगरसेवक बबन गुलदगड यांनी विविध सूचना व मार्गदर्शन केले जनगणने संदर्भात यावेळी एक विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे दिनांक १ मे २०२६ ते १५ मे २०२६ या काळात नागरिक स्वयं गणना करू शकतात यासाठी ऑनलाइन पोर्टलवर जाऊन स्वतःची माहिती स्वतः भरता येईल त्यामुळे प्रगणक यांचा वेळ वाचेल आणि कामाचे सूत्रता येईल जनगणने दरम्यान दिली जाणारी माहिती पूर्णपणे सुरक्षित आणि गोपनीय ठेवली जाईल असे प्रशासन हे स्पष्ट केले आहे.

प्रगणक जेव्हा आपल्या घरी येतील तेव्हा त्यांच्याकडे अधिकृत ओळखपत्र असेल नागरिकांनी घाबरून न जाता अचूक माहिती देऊन या राष्ट्रीय कार्यात सहकार्य करावे असे आवाहन प्रशासकीय पथकाने केलेले आहे चार्ज अधिकारी अभिजीत हराळे जनगणना अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली जनगणना टीम चे अधिकारी शंकर आगलावे व स्वप्निल हारेल टेक्निशियल हे काम करत आहे. फिल्ड टेनर गायकवाड सर, मोरे सर, खैरनार सर, गिरी सर हे सर्व प्रगनक व पर्यवेक्षक यांना प्रशिक्षण देण्याचे काम करताहेत.

सदर प्रशिक्षणासाठी राहुरी कॉलेज, प्रगती विद्यालय,विद्यामंदिर मंदिर प्रशाला, भागीरथी शाळा, राहुरी नगर परिषद कर्मचारी व अधिकारी यांची प्रगणक व पर्यवेक्षण म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. पहिल्या टप्प्यातील अनुपस्थित असणाऱ्या प्रगणक व पर्यवेक्षक यांच्यावर चार्ज अधिकारी तथा मुख्याधिकारी अभिजीत हराळे यांनी कारणे दाखवा नोटीसा बजावण्यात येणार आहेत.

## साईनाथ वर्पे यांची पोलीस उपनिरीक्षकपदी निवड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी** : कोपरगाव तालुक्यातील रांजणगाव देशमुख येथील सुपुत्र साईनाथ चिमाजी वर्पे यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या पोलीस उपनिरीक्षक (पीएसआय) विभागीय मर्यादित स्पर्धा परीक्षेत यश संपादन करून पोलीस उपनिरीक्षकपदी निवड झाली आहे. सध्या ते अकोले तालुक्यातील राजूर पोलीस ठाण्यात कार्यरत आहेत. साईनाथ वर्पे हे मागील १२ वर्षांपासून पोलीस शिपाई पदावर कार्यरत असून नोकरी सांभाळत त्यांनी पीएसआय होण्याचे स्वप्न जोपासले. सन २०१९ पासून त्यांनी विभागीय मर्यादित परीक्षेची तयारी सुरू केली. २०२२ मध्ये पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा आणि शारीरिक चाचणीत यश मिळवूनही अंतिम निवडीत केवळ साडेपाच गुणांनी त्यांची संधी हुकली होती. मात्र अपयशाने खचून न जाता त्यांनी नव्या जोमाने तयारी सुरू ठेवली. सन २०२३ मध्ये पुन्हा मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर त्यांनी अखेर पीएसआय पदाला गवसणी घातली. विशेष म्हणजे शारीरिक चाचणीत त्यांनी १०० पैकी १०० गुण मिळवले. या यशामागे आई-वडिलांचे आशीर्वाद, पत्नी सोनाली यांची साथ तसेच एस. के. फिटनेसचे संचालक सागर खालकर यांचे मार्गदर्शन लाभल्याचे वर्पे यांनी सांगितले. त्यांच्या निवडीबद्दल रांजणगाव देशमुखसह पंचक्रोशीतील ग्रामस्थ, मित्रपरिवार आणि विविध मान्यवरांकडून अभिनंदन होत आहे. आमदार आशुतोष काळे यांनीही शुभेच्छा दिल्या आहेत.

## सोलर प्लांटच्या कामामुळे शेकडो पाईपलाईन तुटल्या

### शेतकऱ्यांचा तीव्र आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : राहाता तालुक्यातील शिंगवे येथे सुरू असलेल्या सोलर प्लांटच्या उभारणीमुळे शेकडो शेतकऱ्यांच्या पाईपलाईन तुटून पिकांचे मोठे नुकसान झाल्याचा आरोप करत संतप्त शेतकऱ्यांनी काम तात्काळ बंद करून संबंधित कंपनीवर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे. याबाबत जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शिंगवे येथील गट क्रमांक १३६ मधील जागेत विक्रान इंजिनियरिंग लि. कंपनीकडून सोलर प्लांटचे काम सुरू आहे.

कंपनीने निष्काळजीपणे काम करताना शेतकऱ्यांच्या शेतीतील पाईपलाईन तोडल्या. प्रत्येक शेतकऱ्याचे सुमारे ५०० ते ७०० फूट पाईपलाईनचे नुकसान झाले आहे. गेल्या चार महिन्यांपासून पाईपलाईन बंद असल्याने पाणीपुरवठा खंडित झाला असून अनेक शेतकऱ्यांची पिके जळून नष्ट झाली आहेत. शेतीमालाला भाव नसणे आणि नैसर्गिक संकटांमुळे आधीच अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांची अवस्था आणखी बिकट झाली आहे.

## वाढत्या चोरीच्या घटनांमुळे ग्रामसुरक्षा यंत्रणा सुरू करण्याची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**झरेकाठी** : संगमनेर तालुक्यातील झरेकाठी व परिसरातील गावांमध्ये वाढत्या चोरी व दरोड्याच्या घटनांमुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायतीने बंद पडलेली ग्रामसुरक्षा यंत्रणा तात्काळ सुरू करावी, अशी मागणी जनसेवा युवा मंच सदस्य तथा भाजपा बुथ प्रमुख सोमनाथ डोळे यांनी केली आहे. सोमनाथ डोळे यांनी सांगितले की, मागील पंचवार्षिक काळात ग्रामसुरक्षा यंत्रणा सुरू करण्यात आली होती. मात्र शासनाकडे आवश्यक शुल्क न भरल्यामुळे ही यंत्रणा सध्या बंद पडली आहे. गेल्या आठ दिवसांपासून झरेकाठी व पंचक्रोशीत चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली असून ग्रामस्थांमध्ये दहशतीचे वातावरण आहे. त्यामुळे ही यंत्रणा पुन्हा कार्यान्वित झाल्यास गुन्हेगारांचा शोध घेण्यास पोलिसांना मदत होईल, तसेच नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होईल, असे त्यांनी नमूद केले. ग्रामपंचायतीने ही यंत्रणा अद्ययावत करून अधिकाधिक मोबाईल क्रमांक सामाविष्ट करावेत. तसेच आपत्कालीन संदेश पाठविण्यासाठी आवश्यक संपर्क क्रमांक प्रत्येक ग्रामस्थांपर्यंत पोहोचवावेत, अशीही मागणी करण्यात आली आहे. परिसरातील वाढत्या गुन्हेगारी घटनांच्या पार्श्वभूमीवर ग्रामसुरक्षा यंत्रणा पुन्हा सुरू करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

## बंधाऱ्यांमध्ये तातडीने पाणी सोडण्याची गरज : चौधरी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणतांबा** : परिसरात उन्हाळ्याची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून बहुतांश बंधारे कोरडे पडले आहेत. त्यामुळे या बंधाऱ्यांमध्ये पाटबंधारे खात्याने तातडीने पाणी सोडावे, अशी मागणी जळगावचे माजी सरपंच श्रीगंगाधर पाचौधरी यांनी राहाता येथील पाटबंधारे खात्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे केली आहे. बंधारे कोरडे पडल्यामुळे परिसरातील वाड्या-वस्त्यांवर पाणीटंचाईची झळ बसण्यास सुरुवात झाली आहे. तसेच जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे.

पाण्याअभावी शेतीपिके धोक्यात आली असून शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. गोदावरी उजव्या कालव्याचे पुढील आवर्तन उशिरा येण्याची शक्यता असल्याने परिसरातील पिण्याच्या पाण्याचा व शेतीसाठीच्या पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सध्याच्या आवर्तनाचा कालावधी वाढविण्याची गरज असल्याचे चौधरी यांनी म्हटले आहे.

तसेच जळगाव व पुणतांबा शिवारातील कोरडे बंधारे तातडीने पाण्याने भरून घेण्याची आवश्यकता असून प्रशासनाने याबाबत त्वरित निर्णय घ्यावा, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

करांचा भरणा वेळेवर करा

स्त्री जन्माचे स्वागत करा. | झाडे लावा झाडे जगवा

स्थापना ०६/०९/२०१६ | फोन नंबर (०२४२७)२४१०४५

### नेवासा नगरपंचायत, नेवासा

नेवासा, ता. नेवासा (४१४६०३) जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र)

Email : co.newasa@gmail.com

जा.क्र.न.पं. नेवासा/७०४/२०२६ दिनांक. ३०/०४/२०२६

**जाहीर निविदा सूचना (दुसरी वेळ)**

**सन २०२६-२०२७**

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | Proposed Distribution H.D.P.E Pipeline And Road Crossing For Newasa Nagarpanchayat, Newasa Tal: Newasa, Dist : Ahilyanagar | ८,९७,१२१/- |

टीप: वरील कामासंबधी माहिती निविदा फॉर्म, नियम व अटी नेवासा नगरपंचायत कार्यालयात दि.०६/०५/२०२६ पासून दि. १३/०५/२०२६ संध्याकाळी ५ वाजे पर्यंत उपलब्ध आहे.

**मुख्याधिकारी**
**नेवासा नगर पंचायत नेवासा**

## धुमाळवाडीतील पाच तरुणांची महाराष्ट्र पोलिस दलात निवड

### आ. अमोल खताळ यांच्या हस्ते सत्कार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : ग्रामीण भागातील युवकांनी कठोर परिश्रम, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर पोलिस दलात स्थान मिळवून गावाचे नाव उज्ज्वल केले आहे. या यशामागे कुटुंबियांचे त्याग, कष्ट व सातत्यपूर्ण पाठबळ तितकेच महत्त्वाचे असल्याचे गौरवोद्गार आमदार अमोल खताळ यांनी काढले.

संगमनेर तालुक्यातील डोळासने गावाअंतर्गत धुमाळवाडी येथील महाराष्ट्र पोलिस दलात निवड झालेल्या गणेश रावसाहेब भागवत, योगेश बारकू धुमाळ, विजय प्रभाकर भोईटे, धनंजय सिताराम गांजवे आणि वृषभ यशवंत सुपेकर या पाच तरुणांचा आमदार खताळ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर शिवसेनेचे माजी तालुकाध्यक्ष जनार्दन आहेर, भाजप तालुका अध्यक्ष गुलाब भोसले, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष रऊफ शेख, सूर्या करिअर अकॅडमीचे प्रमुख समीर काकड, गणेश सुपेकर, बाबाजी मोरे, दत्ता गाडेकर आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना आमदार खताळ म्हणाले की, पोलिस दल हे समाजातील कायदा व सुव्यवस्था राखणारे महत्त्वाचे अंग आहे. महाराष्ट्र पोलिस दलात सेवा करताना या तरुणांनी गोरगरीब, वंचित व सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रामाणिकपणे कार्य करावे.

तसेच नागरिकांचा पोलिस प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ करण्यासाठी संवेदनशीलतेने जबाबदारी पार पाडावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. सत्कारमूर्ती तरुणांनी आपल्या यशाचे श्रेय आई-वडील, कुटुंबीय आणि मार्गदर्शकांना दिले. गावातील युवकांनीही त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन विविध क्षेत्रांत यश संपादन करावे, असा संदेश यावेळी देण्यात आला.

### जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः/जन्म-मृत्यू/एसआर/१०८/२०२६
नेवासा दिनांक. २८/०४/२०२६

अर्जदार श्री/श्रीम-शिवाजी रामनाथ निकम रा. दिघी ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/श्रीम. कु. शिवाजी रामनाथ निकम रा. दिघी यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे.

सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.१, जन्म नोंद घेण्यात येणा-या व्यक्तीचे नाव-शिवाजी रामनाथ निकम, गावाचे नाव-दिघी, जन्म दिनांक-०१/०४/१९८५

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहिर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहलिसदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

### जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः जन्म-मृत्यु एसआर/८९/२०२६
नेवासा दिनांक ०२/०४/२०२६

अर्जदार श्री श्रीम-हिराबाई विठ्ठल साप्ते रा. तेलकुडगांव ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन अर्जदार यांनी कै. विठ्ठल गोविंद साप्ते यांचा महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये मृत्यु नोंद गावी जन्म- मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे.

सदरच्या अर्जात खालील प्रमाणे मृत्यु नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.-१., जन्म- मृत्यु नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव-कै. विठ्ठल गोविंद साप्ते, गावाचे नाव-तेलकुडगांव, मृत्यु दिनांक-१५/०५/१९९६

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये मृत्यु नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहिर प्रगटनाच्या तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा, मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबंधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहलिसदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

# स्मशानभूमीत बेकायदेशीर उत्खनन; प्रशासनावर प्रश्नचिन्ह, ग्रामस्थ संतप्त

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोनगाव** : मौजे चनेगाव येथे वाळू उत्खननासाठी टेंडर प्रक्रिया सुरू असताना संबंधित ठेकेदाराने अधिकृत ताबा मिळण्यापूर्वीच थेट स्मशानभूमीत उत्खनन केल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या घटनेमुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून, धार्मिक भावना दुखावल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

प्रशासनाच्या भूमिकेबाबतही प्रश्न उपस्थित केले जात आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, प्रशासनाने गट क्रमांक ३ ते ५ व १७ ते १९ या क्षेत्रासाठी वाळू उत्खननाची अधिसूचना जाहीर केली आहे. मात्र, संबंधित ठेकेदाराने कोणतीही अधिकृत परवानगी किंवा ताबा न घेता १ मे रोजी सायंकाळी गट क्रमांक १ मधील



स्मशानभूमीत पोकलेन मशीनच्या साह्याने उत्खनन सुरू केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

यावेळी स्मशानभूमीतून थेट रस्ता तयार करण्यात आला, तसेच नदीपात्रात मुरूम टाकून रॅम्प उभारण्यात आल्याचेही स्थानिकांनी सांगितले. या उत्खननादरम्यान दफन केलेल्या पूर्वजांचे अवशेष वर आल्याचा धक्कादायक आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

काही अवशेष पुन्हा अन्यत्र दाबून टाकण्यात आल्याचीही चर्चा असून, या प्रकारामुळे केवळ धार्मिक स्थळाचा अपमान झाला नसून मानवी संवेदनांनाही धक्का बसल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे. विशेषतः आदिवासी व दलित समाजातील नागरिकांनी या घटनेचा तीव्र निषेध नोंदवला आहे. या प्रकरणाच्या निषेधार्थ ४ मे रोजी ग्रामस्थांनी एकत्र येत तहसीलदार, प्रांताधिकारी, उपविभागीय पोलिस अधिकारी (डीवायएसपी), स्थानिक पोलीस निरीक्षक तसेच जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन सादर केले. संबंधित ठेकेदारावर भारतीय दंड संहितेतील कलम २९५, २९७ तसेच इतर लागू कायद्यांनुसार गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे. याशिवाय अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गतही कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. एक सामान्य शेतकरी बैलगाडीने वाळू वाहतूक करताना आढळल्यास त्याच्यावर तात्काळ कारवाई होते. मात्र, इतक्या मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर उत्खनन होऊनही संबंधितांवर कारवाई का होत नाही? असा सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.

प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन तत्काळ कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. दरम्यान, संबंधित अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची दखल घेत कारवाईचे आश्वासन दिले आहे. मात्र, प्रत्यक्षात कोणतीही ठोस हालचाल दिसून आलेली नसल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. वेळेत कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. गावातील सामाजिक सलोखा आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी प्रशासनाने संवेदनशीलतेने आणि तातडीने हस्तक्षेप करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई केली जाईल का, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

## पान १ वरुन

### नेवासा बाजार समितीत आजपासून खुल्या कांदा खरेदी विक्रीला सुरुवात

मुरमे, सुरेगाव गंगा, सुरेगाव दही, देडगाव, पाचेगाव, पुनतगाव, खुपटी, बेलपिंपळगाव, बेलपांढरी तसेच नेवासा बुद्रुक परिसरासह नेवासा तालुक्यातील शेतकऱ्यांना या सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

नेवासा येथे खुल्या कांदा विक्रीस सुरुवात झाल्यामुळे शेतकऱ्यांना बाहेरगावी जाऊन विक्री करण्याची गरज भासणार नाही. त्यामुळे त्यांचा वेळ आणि खर्च वाचणार आहे. तसेच, कांदा विक्रीनंतर शेतकऱ्यांना तत्काळ काटा-पट्टी पेमेंट मिळणार असल्याने आर्थिक व्यवहार सुलभ होणार आहेत. या नव्या उपक्रमामुळे नेवासा शहरातील बाजारपेठेला चालना मिळून स्थानिक अर्थकारण अधिक बळकट होणार आहे.

.............

### मराठवाडा-विदर्भात 'अवकाळी' गारवा

हैराण झालेल्या नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला. जालना तालुक्यात आज अचानक काही भागात वादळी वाऱ्यासह पावसाने जोरदार हजेरी लावली. रामनगर कारखाना परिसरात दुपारी अचानक वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस बरसला. गेल्या काही दिवसांपासून जालना जिल्ह्यात तापमानाचा पारा वाढल्याने नागरिक उकाड्याने प्रचंड हैराण झाले होते. मात्र, या पावसाने परिसरातील हवेत गारवा निर्माण झाल्याने नागरिकांना उष्णतेपासून तात्पुरता दिलासा मिळाला.

गोंदिया, गडचिरोली, भंडारा, नंदुरबारमध्ये अवकाळीने हजेरी लावून जनजीवन विस्कळीत केले. सध्या लग्नसराई सुरु असल्याने चंदगड, गडहिंग्लज, आजरा, सिंधुदुर्ग आणि गोव्यातून खरेदीसाठी आलेल्या लोकांची पंचाईत झाली. अनेक ठिकाणी झाडें विजेच्या तारावर कोसळल्यामुळे विद्युत पुरवठा खंडित झाला. गेल्या दोन दिवसापासून तापमानात वाढ होऊन उष्माही वाढला होता.

.............

### शेतकऱ्यांना एकरी २ कोटी रुपये, आणि विमानतळावर नोकरी

व्याजासहित एक एकरला १ कोटी ६१ लाख १ हजार ९२५ रुपये एवढा रेट मिळाला आहे. ज्या शेतकऱ्याची फळबागाची जमीन असेल तर त्याला डबल रेट देण्यात येणार आहे. शेतात जर विहीर किंवा बोरवेल असेल तर त्याचीही किंमत ठरवण्यात आली आहे. त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याला कमी जास्त करून सरासरी २ कोटी रुपये त्याच्या खात्यात देण्यात येतील.

आपण शेतकऱ्यांकडून जेवढी जमीन घेतोय त्याच्या दहा १० जमीन विकसित भूखंड शेतकऱ्यांना परत देण्यात येणार असल्याची मोठी घोषणा जिल्हाधिकाऱ्यांनी केली. त्याचसोबत ज्या शेतकऱ्याचं घर जाणार आहे त्याच्या अतिरिक्त अडीच गुंठे जमीन घरासाठी दिली जाणार आहे. भूमीहिन शेतकऱ्यांना साडे सातशे दिवसांचे वेतन दिले जाणार आहे. तसेच प्रत्येक शेतकऱ्याच्या कुटुंबातील एकट्याला विमानतळावर नोकरी देण्यात येणार आहे. येत्या ७ मे पासून ही प्रक्रिया सुरू करण्यात येणार असून शेतकऱ्यांच्या त्यांच्या बँक खात्यात रक्कम पाठवण्यात येणार आहे. पुरंदर विमानतळाची टेंडर प्रक्रिया पूर्ण करून ऑक्टोबर, नोव्हेंबरमध्ये कामाला सुरूवात करण्यात येणार आहे. पुरंदर विमानतळाचं काम येत्या तीन वर्षांत पूर्ण होण्याचा अंदाज असल्याचं जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितलं.

.............

### नेवासा तालुक्यातील चौघांचा मृत्यू

आहे. तर राज्य परिवहन बसचेही मोठा नुकसान झाले आहे. बसमधील प्रवाशांच्या स्थितीबाबत अद्याप माहिती मिळू शकलेली नाही. अपघात कशामुळे झाला हेही स्पष्ट होऊ शकले नाही. मात्र यामुळे या मार्गावरील वाहतुकही प्रभावीत झाली होती.

.............

### तरुणाला कपडे काढून बांधून ठेवले!

यांच्या फिर्यादीवरून नगर तालुका पोलीस ठाण्यात प्रवीण विजय मोरे (रा. आठवड, तालुका नगर), शरद खंडू पवार, मारुती देवराम कोकाटे (दोघे रा. चिचोंडी पाटील, ता. नगर) रॉबिन सिंग व एक अनोळखी यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम (२ )११९ (१) व इतर कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मंगळवारी रात्री उशिराने हा गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल झाल्याचे समजताच या गुन्हेतील आरोपी फरार झाले. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन नगर तालुका पोलिसांनी फरार आरोपींच्या तपासासाठी पथके रवाना केली आहेत. या गुन्ह्याचा अधिक तपास नगर तालुका पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक वारुळे यांच्या नेतृत्वाखाली पो. स. इ. पतंगे हे करीत आहेत. या गुन्ह्यातील आरोपी हे खासदार निलेश लंकेचे समर्थक असल्याचे समजते.

सध्याच्या काळात राजकारण हे आता शाब्दिक आरोपांचे राहिले नसून ते थेट हाणामारी पर्यंत जाऊन पोहोचले आहे. सोशल मीडियावर अनेक वेळा मोठे नेते, सेलिब्रेटी यांच्या विषयी वादग्रस्त पोस्ट व्हायरल होत असतात. परंतु या घटनेमध्ये २८ वर्षे तरुणाला उघडे करून डांबून ठेवून मारहाण केली. तसेच त्याला लघवी पाजण्याचा किळसवाना प्रकार घडल्याचे फिर्यादीत नमूद आहे. हा प्रकार मानवी हक्कास काळीमा फासणारा प्रकार आहे. या प्रकारामुळे नगर तालुक्यासह अहिल्यानगर जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे.

## शेतकरी मुलाशी लग्नासाठी मुलींनी पुढाकार घ्यावा : प्रा. संदीप जगताप




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** आपला शेतकरी बाप जिवंत रहावा, यासाठी मुलींनी लग्नाच्या अटी व स्वप्ने बदलावीत. शहरातील नोकरदार मुलगा आणि शाही विवाहसोहळ्यांपेक्षा साधे लग्न व शेतकरी मुलाला प्राधान्य द्यावे, असे आवाहन सुप्रसिद्ध कवी प्रा. संदीप जगताप यांनी केले.लोणी येथे प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या कर्मचारी नंदिनी वाघमारे यांच्या सेवापूर्ती व साठाव्या वाढदिवसानिमित्त आयोजित कृतज्ञता सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी 'जागर माता अन् मातीचा' या विषयावर त्यांचे व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी शालिनीताई विखे होत्या. प्रमुख उपस्थितीत मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील, डॉ. उत्तम कदम आदी मान्यवर होते. प्रा. जगताप यांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्यांना खोटी प्रतिष्ठा व लग्नखर्च कारणीभूत असल्याचे सांगितले. नव्या पिढीने आई-वडील व जमिनीचे जतन करावे, महिलांनी अंधश्रद्धेला बळी न पडता कष्टाला महत्त्व द्यावे, असे त्यांनी नमूद केले. डॉ. उत्तमराव कदम यांनी महिलांच्या जबाबदाऱ्यांचा गौरव केला. डॉ. सुस्मिता विखे यांनी सौ. वाघमारे यांच्या संघर्षमय जीवनप्रवासाचे कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रांजली सोनवणे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. बाळासाहेब वाघमारे यांनी, तर आभार प्रदर्शन सुयश वाघमारे यांनी केले. कार्यक्रमास विविध क्षेत्रांतील मान्यवर व आप्तेष्ट मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चिमुकलीवर अत्याचार करणाऱ्या आरोपीला फाशी द्या : मगर




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** पुणे जिल्ह्यातील नसरापूरमध्ये लहान मुलीवर अत्याचार करणाऱ्या आरोपीला फाशी द्या, अशी मागणी भीमशक्ती संघटनेच्यावतीने निवेदनाव्दारे करण्यात आली आहे. जिल्हाध्यक्ष संदीप मगर यांच्या नेतृत्वाखाली येथील अपर पोलीस अधीक्षक कार्यालातील पीएसआय चारुदत्त खोंडे यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी मगर म्हणाले की, पुणे शहरांमधील नसरापूर येथील तीन वर्षांच्या लहान मुलीला वासरू दाखवण्याच्या आमिषाने तिच्यावर अत्याचार करून तिची दगडाने व फरची ने ठेचून हत्या केली व तिला गोठ्यातल्या शेणाखाली तिचा मृतदेह लपवून ठेवला. ही घटना महाराष्ट्राला काळीमा फासणारी आहे. त्यामुळे अत्याचार करणाऱ्या नराधमाला फाशी शिक्षा देण्यात यावी, असे यावेळी मगर म्हणाले. याप्रसंगी भागचंद नवगिरे, सागर भोंडगे, किरण खंडागळे, विश्वास भोसले, संतोष केदारी, बबलू त्रिभुवन, अनिल माघाडे, महिला जिल्हा उपाध्यक्ष विजया बारसे, रेणुका गवळी, रोहिणी बनसोडे, मंजुश्री खंडीझोड, श्रद्धा खंडीझोड, खुशबू पठाण, खुशाल मोगले, दर्शन बारसे, अभिषेक बारसे आदी उपस्थित होते.

## शिक्षक सेनेच्या वतीने गटशिक्षणाधिकारी अरविंद कापसे यांचा सत्कार



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** तालुक्यात शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून कार्यरत असलेले श्री. अरविंद कापसे यांची पंचायत समिती गंगापूर येथे गटशिक्षणाधिकारी पदावर पदोन्नती झाल्याबद्दल शिक्षक व शिक्षकेत्तर सेनेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. गटशिक्षणाधिकारी कापसे हे मागील ४ ते ५ वर्षांपासून गंगापूर तालुक्यात कार्यरत असून, गेल्या एक वर्षापासून त्यांनी गटशिक्षणाधिकारी पदाचा प्रभारी कार्यभार यशस्वीपणे सांभाळला होता. महाराष्ट्र शासनातर्फे तांत्रिक सेवेतील ५१ विस्तार अधिकाऱ्यांना उपशिक्षणाधिकारी व तत्सम पदावर पदोन्नती देण्यात आली असून, त्यामध्ये कापसे यांना गंगापूर तालुक्यातच पदोन्नती मिळाली आहे.

या सत्कार कार्यक्रमास विस्तार अधिकारी अनिल सकदेव, शापोआ अधिक्षक संगीता हरकारे, शिक्षक सेनेचे मराठवाडा उपाध्यक्ष अनिल काळे, जिल्हा सरचिटणीस भगवान हिवाळे, तालुकाध्यक्ष राजेंद्र बोल्डे, विलास वाघ,हरिश्चंद्र खोसे, अभिषेक शहाणे,आबाजी सोनवणे,जिल्हा प्रसिद्धी प्रमुख उद्धव बोचरे, जिल्हा उपाध्यक्ष दीपक साबळे, तालुका संपर्कप्रमुख कैलास गायके, तालुका सरचिटणीस सचिन साळुंके, तालुका कोषाध्यक्ष निलेश कहाटे, तालुका प्रसिद्धीप्रमुख जावेद पटेल, केंद्रप्रमुख केशव देसले, ईश्वर पवार, कडू जाधव,दिनेश देशपांडे, अनिल वाहुरवाघ, भगवान जगताप.तसेच कनिष्ठ सहाय्यक करण मोहिते,विशेष शिक्षक रामकिशन पांचाळ,सुमिती काळगे, गणेश गवांदे, महेंद्र भावसार यांच्यासह शिक्षक सेनेचे पदाधिकारी उपस्थित होते. गंगापूर तालुक्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती, नवोदय व एनएमएमएस परीक्षांमध्ये मिळवलेल्या यशाचे प्रभावी सादरीकरण प्रशासनाकडून करण्यात यावे, तसेच शिक्षकांचे कोणतेही प्रश्न तालुकास्तरावर प्रलंबित राहणार नाही याची काळजी घ्यावी.

## आरोग्य सेविकेचा विनयभंग; बदलीच्या आमिषातून छळ, जीवे मारण्याच्या धमक्या

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :** परिसरातील एका महिला आरोग्य सेविकेचा विनयभंग करून बदलीचे आमिष दाखवत मानसिक छळ केल्याची गंभीर घटना समोर आली आहे. शरीरसुखाची मागणी, वारंवार त्रास देणे तसेच जीवे मारण्याच्या धमक्या दिल्याप्रकरणी सोनई पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीच्या तात्काळ अटकेची मागणी नागरिकांतून होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी या सोनई प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत लोहगाव उपकेंद्र येथे आरोग्य सेविका म्हणून कार्यरत आहेत. आरोपी रमेश सुखदेव जावळे (रा. कोल्हार, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर) याने फेब्रुवारी २०२६ पासून माझी वरपर्यंत ओळख आहे, तुला तुझ्या जिल्ह्यात बदली करून देतो, असे आमिष दाखवत शरीरसुखाची मागणी केली. तसेच, फिर्यादी कामावर जात असताना आरोपीने त्यांच्या स्कुटीचा रस्ता अडवून वैयक्तिक आयुष्याबाबत अश्लील व अपमानास्पद प्रश्न विचारले. माझे म्हणणे मान्य केले नाही तर तुला नोकरीतून निलंबित करीन, तसेच स्थानिक मुलांना तुझ्या मागे लावीन, अशी धमकी देत सातत्याने मानसिक छळ केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. दि. १ मे रोजी महाराष्ट्र दिनानिमित्त प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यक्रम सुरू असताना आरोपी तेथे पोहोचला. तू कुठेही तक्रार कर, माझे कोणी काही वाकडे करू शकत नाही, असे म्हणत त्याने उघडपणे दमदाटी केल्याचे सांगण्यात आले. या घटनेमुळे उपस्थित नागरिकांत संताप व्यक्त करण्यात आला. यानंतर दि. २ मे रोजी फिर्यादी यांनी तालुका आरोग्य अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार दिल्यानंतर आरोपीने आरोग्य केंद्राबाहेर फिर्यादी व त्यांच्या पतीसमोर बाहेर या, तुमची वाट लावतो; सोनईत कसे राहता ते पाहतो, अशा शब्दांत जीवे मारण्याची धमकी दिली. त्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकरणी सोनई पोलिस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक फौजदार पवार करीत आहेत.

> महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर
>
> **ही घटना ग्रामीण भागातील महिलांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न निर्माण करणारी ठरली आहे. आरोग्य सेवेसारख्या जबाबदारीच्या क्षेत्रात कार्यरत महिलांनाही सुरक्षितता मिळत नसेल, तर प्रशासनाने केवळ गुन्हा नोंदवून न थांबता ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांतून होत आहे. आरोपीला तत्काळ अटक करून तपास जलदगतीने पूर्ण करावा, अशीही मागणी करण्यात येत आहे.**

## निधन वार्ता

### मरकर्णा पटारे



**टाकळीभान :** येथील जुन्या पिढीतील प्रगतशील शेतकरी कुटुंबातील , मरकर्णा भास्करराव पटारे (वय ७५ ) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात एक मुलगा ३ मुली २ नातू व सुना- नातवंडे असा परिवार असून एसटी महामंडळाचे श्रीरामपूर आगाराचे संघटनेचे अध्यक्ष अमोल पटारे व विशाल पटारे यांच्या त्या आजी होत.

### रोहिणी देशमुख



**एरंडगाव :** शेवगाव येथील रोहिणी भास्करराव देशमुख (वय ८४) यांचे बीड येथे वृद्धपकाळाने दुःखद निधन झाले .त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे . त्या मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते विजयराव देशमुख, शिक्षक राहुल देशमुख यांच्या मातोश्री होत्या.

## टाकळीभान उपबाजारात लूज कांदा मार्केटला शनिवारपासून प्रारंभ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** कांदा काढणी हंगाम सुरू झाल्यामुळे शेतकऱ्यांना विक्रीत कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी श्रीरामपूर कृषी उत्पन्न बाजार समितीने टाकळीभान उपबाजार आवारात दिनांक ९ मे २०२६ पासून लूज कांदा मार्केट सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

नवीन हंगामाच्या पार्श्वभूमीवर व्यापारी, हमाल व मापाडी यांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देत कांदा खरेदी-विक्री प्रक्रिया पारदर्शक व सुरळीत करण्यावर भर देण्यात आला. अलीकडील काळात काही शेतकऱ्यांचे कांद्याचे पैसे बुडाल्याच्या घटना लक्षात घेता, अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे. बाजार समितीचे सभापती सुधीर नवले व सचिव साहेबराव वाबळे यांनी शेतकऱ्यांना आवाहन केले की, शेतकऱ्यांनी आपला कांदा शेतावरच विक्री न करता बाजार समितीच्या टाकळीभान उपबाजार आवारात विक्रीसाठी आणावा, जेणेकरून व्यवहार सुरक्षित होतील.

या बैठकीस संचालक सचिन गुजर, राजेंद्र पाऊलबुद्धे, सोन्याबापू शिंदे, दशरथ पिसे, मयूर पटारे, विद्याताई दाभाडे, राजू चक्रनारायण यांच्यासह व्यापारी, हमाल व मापाडी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून त्यांच्या उत्पादनाला योग्य दर व सुरक्षित व्यवहाराची हमी मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

## मंथन स्पर्धा परीक्षेत आदर्श विद्यालयाची राज्यस्तरावर गरुडभरारी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :** मंथन सामान्य ज्ञान परीक्षेत सोनई येथील आदर्श विद्या मंदिर प्राथमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत राज्यस्तरावर डंका वाजवला आहे. विद्यालयाने पुन्हा एकदा आपली गुणवत्ता सिद्ध करून दाखवली आहे. राज्यभरातून हजारो विद्यार्थ्यांनी या परीक्षेत सहभाग घेतला होता. या स्पर्धेत आदर्श विद्या मंदिर सोनई प्राथमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी राज्य व जिल्हा गुणवत्ता यादीत आपले स्थान निश्चित केले आहे. त्यामुळे परिसरात विद्यालयाचे कौतुक होत आहे. इयत्ता पहिलीतील शिवांश सागर शिंदे (१३८/१५०), क्षितिजा प्रकाश मंडलिक (१३४/१५०), रागिणी मंगेश पवार (१२६/१५०), कार्तिक प्रकाश कोबरणे (११८/१५०), सार्थक बापू फुळमाळी (११४/१५०), सिध्दी रामेश्वर राखुंडे (११४/१५०), आरूष अनिल क्षीरसागर (११२/१५०), शरण्या देविदास कदम (११२/१५०), आदित्य प्रशांत गडाख (११०/१५०), सान्वी सागर टेमक (११०/१५०), समर्थ महेश गर्जे (११०/१५०), आराध्या राजेंद्र बटोळे (११०/१५०) यांनी यश मिळविले. दुसरीतील काव्या योगेश बोऱ्हाडे (११२/१५०), तिसरीतील सारिम मुश्ताक शेख (२७२/३००), दिशा प्रशांत गडाख (२६४/३००), तेजस्विनी रविंद्र दहितुळे (२६४/३००), श्रेया मनोज बोरुडे (२६२/३००), प्रणिता ज्ञानेश्वर बोरुडे (२५८/३००), आरोही बाबासाहेब गडाख (२५४/३००), श्रीयश सुनिल मुगसे (२५२/३००), श्रेया सोन्याबापू शिंदे (२५०/३००) यांनीही यश संपादन केले. चौथीतील श्रेया ज्ञानेश्वर लांडे (२८८/३००), प्रांजल कानिफनाथ लांडे (२८८/३००), समर्थ अशोक कुमावत (२८२/३००), ऋषिकेश संदीप गाढे (२७६/३००), ईश्वरी ज्ञानेश्वर लांडे (२७०/३००), आरुषी देविदास लांडे (२७०/३००), कुणाल ईश्वर गर्जे (२६८/३००), वेदिका सारंग देशमुख (२६८/३००), प्रांजल शेटिबा कुसळकर (२६६/३००), श्रेयस रामराव हिवरे (२६६/३००), कार्तिकी केशव हिवरे (२६६/३००), श्रावण सागर दातिर (२६४/३००) यांनी घवघवीत यश मिळविले. या सर्व विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक अनिल दरंदले तसेच सर्व शिक्षकवृंद यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे संस्थेच्या अध्यक्षा सौ. जयश्रीताई गडाख व सचिव रविराज गडाख यांनी अभिनंदन केले आहे.

**CHANGE IN NAME**

My old name is Pramod Kumar Thakur
With reference of Gazette number M2638762 month April 2026 addition no 12 page no 261
My New Name is Pramod Kumar Shrichand Thakur and Both person are Same

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAME
SHAIKH JAVED SHAIKH JALIL
(LEAVING CERTIFICATE)
( BEFORE NAME )
TO NEW NAME AS
JAVED JALIL SHAIKH
(AADHAR NO. 7677 2094 6323)
FROM VIDE AFFIDAVIT
BEFORE NOTARY PUBLIC
KOPARGAON
PLACE: KOPARGAON
DATE : 01/05/2026

## अंगारकी निमित्त पावन गणपती मंदिरात हजारों भाविकांचे दर्शन




**फोटो ओळी-नेवासा येथील पावन गणपती मंदिरात अंगारक संकष्टी चतुर्थी निमित्त दर्शन घेतांना भाविक व जागृत पावन गणपतीची मूर्ती दिसत आहे.(छाया-सुधीर चव्हाण नेवासा)**

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** नेवासा ते नेवासा फाटा रस्त्यावर असलेल्या पावन गणपती मंदिरामध्ये अंगारक संकष्टी चतुर्थी निमित्ताने हजारो भाविकांनी गणयरायाचा जयघोष करत पावन गणेशाचे दर्शन घेतले पहाटे पासून हजारो भाविकांनी दर्शनासाठी येथे गर्दी केली होती.यामध्ये महिलांची संख्या लक्षणीय होती

अंगारक संकष्टी चतुर्थी निमित्ताने पहाटे पासूनच दर्शनासाठी आलेल्या भाविकांनी पावन गणपतीच्या मूर्तीस वेदमंत्राच्या जयघोषात अभिषेक घातला. नवसाला पावणारा गणपती अशी ''पावन गणपती'' या देवस्थानची ओळख आहे. चतुर्थी निमित्ताने महिला भजनी मंडळाने दिवसभर भजनांचे कार्यक्रम सादर केले.मंदिर प्रांगणात हार फुले नारळ,सौंदर्य प्रसाधने प्रसाद भंडार यांची दुकाने मोठ्या प्रमाणात थाटल्याने मंदिर परिसराला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते.

सांयकाळच्या सुमारास तर मंदिराच्या बाहेर दर्शनासाठी मोठ्या रांगा लागल्या होत्या.यावेळी आलेल्या भाविकांचे देवस्थान स्ट्रस्टचे अध्यक्ष अँड.सुखदेव वाखुरे,अँड. नरेंद्र लोंढे अँड.बाळासाहेब शिंदे यांच्यासह पुजारी दत्तात्रय गायकवाड,गोविंदराव कदम,संपतराव कडू व जगन्नाथ नागपुरे यांनी भाविकांचे स्वागत केले भाविकांना रांगेत दर्शन घेता यावे म्हणून स्वयंसेवकाची भूमिका ही बजावली.

अंगारकी चतुर्थीच्या निमित्ताने रात्री ७.३० ते ८.३० यावेळेत नेवासा बुद्रुक येथील ज्ञानेश्वर महाराज पेचे यांचे सुश्राव्य वाणीतून गणरायाचा महिमा याविषयी प्रवचन झाले यावेळी दत्तात्रय चिंधे व परिवाराच्या वतीने उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करून अंगारक संकष्टी चतुर्थी उत्सवाची सांगता करण्यात आली.

श्री पावन गणपती देवस्थान हे पुरातन जागृत असे क्षेत्र असून श्री क्षेत्र देवगडचे महंत गुरुवर्य भास्करगिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली मंदिराच्या जीर्णोद्धार करण्यात आला त्यानंतर सुंदर असे दाक्षिणात्य शिल्पकला असलेले मंदिर निर्माण झाले.मंदिराच्या शेजारीच विठ्ठल रुख्मिणी व महादेवाचे तर मंदिर प्रांगणात हनुमंतरायांचे मंदिर आहे. जेष्ठ विधी तज्ञ अँड.सुखदेव वाखुरे व विश्वस्त मंडळींनी भाविकांच्या सहकार्याने मंदिराच्या मागेच देवस्थानचे कार्यालय भक्त निवास,स्वयंपाक कक्षाची निर्मिती करून भाविकांसाठी सुविधा निर्माण केली आहे.

मंदिराच्या पुढील सुशोभीकरण कामासाठी भाविकांनी सढळ हाताने मदत करावी असे आवाहन देवस्थान विश्वस्त मंडळ व व भक्त परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

## नशिबाची परिक्षा

**बुधवार दि .०६ मे २०२६**

### मिलनम डे

उदय-अस्त — सिंगल ५-१-९ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| १४० २३० ७८० | ५-४ | १५८ २४८ २२० | ५९-७४-१६-८०-४३ |

### कल्याण

उदय-अस्त — सिंगल ९-४-५ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| १२९ ४८० २२८ | २-९ | १२६ ४३० ११७ | २१-८९-०३-२५-९६ |

### मुंबैम (मेन)

उदय-अस्त — सिंगल ४-७-९ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| २७० २८९ २२५ | ९-५ | १४० २३० ७८० | ९०-४५-१३ २६-६७ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 47 269 | 244 03 247 | *** ** *** | 257 48 279 | 466 65 249 |
| 09/03/2026 to 13/03/2026 | 236 16 240 | 168 56 880 | 578 05 889 | 248 43 148 | 334 09 135 |
| 16/03/2026 to 20/03/2026 | 456 56 899 | 200 21 380 | 460 02 499 | 127 02 138 | 670 38 378 |
| 23/03/2026 to 27/03/2026 | 689 34 356 | 455 46 178 | 569 03 788 | 130 46 240 | 330 64 167 |
| 30/03/2026 to 03/04/2026 | 289 90 136 | 134 87 160 | 270 97 278 | 119 12 156 | 169 66 259 |
| 06/04/2026 to 10/04/2026 | 133 70 226 | 145 02 778 | 135 98 477 | 350 82 156 | 124 78 468 |
| 13/04/2026 to [illegible] | 56[illegible] 06 15[illegible] | 14[illegible] 43 67[illegible] | 23[illegible] 45 50[illegible] | 133 77 890 | 26[illegible] 85 14[illegible] |
| 27/04/2026 to 01/05/2026 | 358 63 120 | 440 85 780 | 160 71 128 | | |

✻ वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये ✻

# अहिल्यानगरमध्ये पाणीपुरवठ्याचा बोजवारा; नागरिक संतप्त

## वॉलमनच्या उध्दट वागणुकीविरोधात तीव्र नाराजी, कारवाईची मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : शहर व उपनगरांमध्ये गेल्या दोन ते तीन महिन्यांपासून पाणीपुरवठा पूर्णपणे विस्कळीत झाल्याने नागरिकांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत असून प्रशासनाच्या ढिसाळ कारभाराविरोधात नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर नगरसेवक व नागरिकांच्या वतीने महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुक्तेकर निवेदन सादर करून तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी नगरसेवक निखिल वारे नगरसेवक महेश लोंढे सामाजिक कार्यकर्ते अभिजीत बोरुडे रोहन फडतरे आदीसह नागरिकांनी केली सध्या.

उन्हाळ्याचे दिवस सुरू आहे या पार्श्वभूमीवर पिण्याच्या पाण्याची गरज वाढलेली असताना, वीज वितरणातील अडचणी, भारनियमन तसेच नियोजनाच्या अभावामुळे शहरात वेळेवर आणि पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा होत नसल्याची गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. परिणामी नागरिकांना पिण्याचे पाणी मिळवण्यासाठी इतर ठिकाणी भटकंती करावी लागत असून दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे.



नागरिकांनी पाणीपुरवठ्याबाबत माहिती घेण्यासाठी संबंधित वॉलमनशी संपर्क साधला असता, त्यांच्याकडून उडवाउडवीची व उध्दट उत्तरे दिली जात असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. तसेच पाणीपुरवठ्याची नोंद ठेवण्यासाठी आवश्यक असलेली डायरी व्यवस्थित न भरणे, नागरिकांच्या स्वाक्षऱ्या न घेणे अशा प्रकारच्या बेजबाबदार वर्तणुकीमुळे परिस्थिती अधिक गंभीर झाली आहे.

या संपूर्ण प्रकारामुळे महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. याचा फटका प्रभागातील लोकप्रतिनिधींनाही बसत असून त्यांना नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे.

या पार्श्वभूमीवर शहरातील विस्कळीत झालेला पाणीपुरवठा तात्काळ सुरळीत करावा, वॉलमनच्या बेजबाबदार वर्तणुकीवर कठोर कारवाई करावी तसेच पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख, प्रभाग अधिकारी, हेड वॉलमन व संबंधित कर्मचाऱ्यांची तातडीची बैठक आयोजित करून ठोस निर्णय घ्यावेत, अशी ठाम मागणी नगरसेवकांनी केली आहे.

दखल



### आजच्या पिढीने पर्यावरणाचे रक्षण केल्यास त्यांच्या भावी पिढ्या सुरक्षित : सपकाळ

**अहिल्यानगर** : पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत वाढदिवस साजरा करण्याची एक प्रेरणादायी उपक्रम हरदिन मॉर्निंग ग्रुपचे सदस्य सातत्याने राबवित आहेत. ग्रुपचे सदस्य सर्वेश सपकाळ यांनी आपला मुलगा ईवानचा वाढदिवस वृक्षारोपणाने साजरा केला. एक वाढदिवस एक वृक्ष हा संदेश समाजात पोहोचत असून, लावलेल्या झाडाच्या संवर्धनाची जबाबदारी देखील घेतली जात आहे. भिंगार येथील भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्कमध्ये ईवान सपकाळ यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या उपक्रमातंर्गत अनेक सदस्यांनी लावलेल्या झाडांमुळे परिसर हिरवाईने बहरले आहे. वृक्षारोपणानंतर रोकडेश्वर मंदिर येथे गरजू नागरिकांना मिष्टान्न भोजनाचे वाटप करून सामाजिक बांधिलकीही जपण्यात आली. या प्रसंगी उद्योजक कमलेश झंवर, डॉ. दमन काशीद, सचिन परदेशी, हरदिनचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, सचिन चोपडा, अशोक दुसुंगे, अभिजीत सपकाळ, अशोक पराते, सतीश सपकाळ, जहीर सय्यद, मुन्ना वाघस्कर, दीपक धाडगे, मनोहर दरवडे, संपत बेरड, जैद सय्यद, नवनाथ वेताळ, शामराव वाघस्कर, रमेश भिंगारदिवे, ओम साळवे, प्रशांत भिंगारदिवे, जीआन सय्यद, शैलेश यादव तसेच प्रांजली सपकाळ, शिल्पाताई दुसुंगे, संगीता सपकाळ, तृप्ती यादव, आर्या यादव, शिल्पाताई झंवर, माधवी माळगे, भाग्यश्री सपकाळ, महिमा माळगे आदी मान्यवर उपस्थित होते. संजय सपकाळ म्हणाले की, आजच्या काळात पर्यावरणाचे संतुलन राखणे ही अत्यंत गरजेची बाब आहे.



### कनिष्ठ महाविद्यालयाचा उत्तुंग निकाल

**शेवगाव** : एच. एस. सी. पुणे बोर्डाचा नुकताच निकाल जाहीर झाला. शेवगाव तालुक्यातील कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहातील चापडगाव कनिष्ठ महाविद्यालयाचा विज्ञान शाखेचा निकाल ८३. ०८ % तर कला शाखेचा ५१.४५ % इतका लागला आहे . कनिष्ठ महाविद्यालयात कु. ढोले गौरी नामदेव हिने ६२. २० % गुण मिळवत प्रथम कु. कांदे वृषाली रंगनाथ हिने ५८. ५० % गुण मिळवत द्वितीय तर म्हस्के यशराज राजेंद्र याने ५५ . ७० % गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळवला. कला शाखेमध्ये कु. गोरे निकिता जालिंदर हिने ७६ % गुण मिळवत प्रथम चि.त-हाळ सौरभ रामेश्वर याने ७२ % गुण मिळवत द्वितीय तर चि. जाधव रोहित सचिन याने ७१. ५०%गुण मिळवत तृतीय क्रमांक पटकावला. विद्यालया मध्ये या यशवंत विद्यार्थांचा प्रशासनातर्फे फाईल व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. या यशस्वी गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष ॲड. डॉ. विद्याधर काकडे, मा. जिल्हा परिषद सदस्या सौ. हर्षदाताई काकडे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. लक्ष्मणराव बिटाळ, उपमुख्यकार्यकारी अधिकारी पृथ्वीसिंह भैय्या काकडे, शिक्षण विभाग प्रमुख श्रीम. वंदना पुजारी,सहप्रमुख अशोक आहेर, कांतेश्वर ढोले, प्राचार्य अरुण वावरे, प्र. प्राचार्या अंजली चिंतामण, पर्यवेक्षक अनिल मगर, अशोक आघवणे, दादासाहेब ज्योतिक, सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी वृंद, पालक, ग्रामस्थ आदिंनी अनिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या .

### भाजपाचे पहिले शहराध्यक्ष गुलशन जग्गी यांचे निधन

**अहिल्यानगर** : भारतीय जनता पार्टीचे नगर शहराचे संस्थापक अध्यक्ष गुलशन जग्गी यांचे



मंगळवारी पुणे येथे खाजगी रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले. ते ८० वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुन व नातवंडे असा परिवार आहे. दिवंगत गुलशन जग्गी यांनी नगर शहरात जनसंघापासून सक्रिय काम करत भारतीय जनता पार्टीच्या स्थापनेनंतर १९८० ते ८५ या काळात ते शहराचे पहिले अध्यक्ष म्हणून नियुक्त झाले होते. प्रतिकूल परिस्थितीत नगर शहरात भारतीय जनता पार्टीचे विचार रुजून काम वाढवण्यात जग्गी यांनी बहुमोल योगदान दिले. त्या काळात आक्रमक भूमिका घेत गुलशन जग्गी यांनी अनेक आंदोलने गाजवली. त्यामुळे अनेकदा त्यांना अटकही झाली. या आक्रमक भूमिकेमुळे नगर शहरात त्यांच्या मोठा दरारा निर्माण झाला होता. अटल बिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, गोपीनाथ मुंडे, प्रमोद महाजन यांच्यासारख्या अनेक दिग्गज नेत्यांची जग्गी यांचा थेट संपर्क असायचा. त्या काळात गोपीनाथ मुंडे व प्रमोद महाजन यांच्याबरोबर त्यांनी अनेक वेळा एसटी व दुचाकीवर प्रवास करून पक्षाचे काम वाढवले. गुलशन जग्गी हे बालपणी फाळणीच्या वेळेस वडिलांसोबत कुटुंबासमवेत भारतात आले व नगरमध्ये स्थायीक झाले. तेलीखुंट येथील सायकल दुकानाचा व्यवसाय सांभाळून त्यांनी भारतीय जनता पार्टीचे काम प्रामाणिकपणे पार पाडले. अत्यंत शांत व मनमिळाऊ स्वभावामुळे ते सर्वत्र सुपरीचीत होते. त्यांच्या निधनामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

## पै. नाना डोंगरे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजरत्न पुरस्कार प्रदान



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : सोजाई आदिवासी महिला विकास फाउंडेशनच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. आळंदी रोड, चरहोली बुद्रुक (जि. पुणे) येथे हा सन्मान सोहळा पार पडला. दिघी येथील पोलीस उपनिरीक्षक प्रमोद वाघ यांच्या हस्ते डोंगरे यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मानपत्र व स्मृतीचिन्ह पुरस्काराचे स्वरुप होते.

या कार्यक्रमाप्रसंगी राष्ट्रपती पोलीस पदक विजेते सिताराम नरके, कार्यक्रमाचे अध्यक्ष उमेश चव्हाण, फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. प्रशांत चव्हाण, सचिव जयश्री सोनवणे, गझलकार रज्जाक शेख, आनंदा साळवे, अभिनेते अतुल गुंजाळ आदी उपस्थित होते. स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्थेचे अध्यक्ष तसेच ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांनी नगर तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात ग्रामीण भागात विविध क्षेत्रांत सातत्यपूर्ण सामाजिक कार्य उभारले आहे. संस्थेच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, साहित्य व धार्मिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. ग्रामीण भागात वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनासाठी विविध उपक्रम राबवून पर्यावरण संवर्धनाबाबत व्यापक जनजागृती निर्माण केली आहे. स्त्री जन्माचे स्वागत, स्वच्छता अभियान, महिला सक्षमीकरण, मतदार जागृती, जलसंधारण जनजागृती मोहीम, रक्तदान शिबिरे यांसारखे उपक्रम व्यापक स्वरूपात राबविले जात आहेत. युवकांसाठी व्यसनमुक्ती संदर्भातील कार्यक्रम, तसेच गावपातळीवर आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून ग्रामस्थांना आरोग्यसेवा देण्याचे कार्यही संस्थेमार्फत सुरू आहे. विविध स्पर्धा, महिला बचत गट मेळावे, युवा संमेलनांच्या आयोजनातून समाजाला सकारात्मक दिशा देण्याचा प्रयत्न सातत्याने केला जात आहे. साहित्य चळवळीला चालना देण्यासाठी पै. नाना डोंगरे यांनी आठ राज्यस्तरीय काव्य संमेलने तसेच चार ग्रामीण मराठी साहित्य संमेलने यशस्वीपणे आयोजित केली आहेत.

### महापौर उद्यानात 'प्रिशा समर कॅम्प'ला उत्साहात प्रारंभ

## मोबाईलपासून दूर जाऊन मुलांनी मैदानी खेळांकडे वळावे : वाकळे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री




**अहिल्यानगर** : आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात मोबाईल, टीव्ही आणि डिजिटल साधनांच्या अति वापरामुळे बालकांमध्ये मैदानी खेळांबद्दलची आवड कमी होत चालली आहे. यामुळे त्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर संत तुकाराम महाराज प्रतिष्ठान, सावेडी यांच्या वतीने महापौर उद्यान येथे 'प्रिशा समर कॅम्प'चे आयोजन करण्यात आले असून या शिबिराला उत्साहात प्रारंभ झाला आहे.

या वेळी माजी महापौर बाबासाहेब वाकळे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, सुदृढ व निरोगी जीवनासाठी मुलांनी बालवयातच मैदानी खेळांची सवय लावणे अत्यंत आवश्यक आहे. आजची मुले ही उद्याच्या भारताचे उज्ज्वल भविष्य असून त्यांच्यात योग्य संस्कार आणि क्रीडावृत्ती निर्माण करणे काळाची गरज आहे.

या समर कॅम्पच्या माध्यमातून बालकांना केवळ खेळच नव्हे, तर क्रीडा, कला, संस्कृती आणि नैतिक मूल्यांचे धडे दिले जाणार आहेत. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास, जिजाऊ मातांचे संस्कार आणि भारतीय परंपरेची ओळख करून देत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला जाणार आहे.

या शिबिरामध्ये थलेटिक्स, योगा, रोप मल्लखांब, लाठी-काठी, हॉर्स रायडिंग, जिम्नॅस्टिक्स, झिप लाईन, सेल्फ डिफेन्स ट्रेनिंग, क्रिकेट, कबड्डी, एरोबिक्स डान्स यांसारख्या विविध क्रीडा प्रकारांसोबतच मजेदार खेळ, जादूचे प्रयोग, गोष्टी सांगणे, सहली आणि बालसंस्कार वर्गांचा समावेश करण्यात आला आहे.

याशिवाय स्वच्छतेचे महत्त्व, शिस्त, टीमवर्क आणि सामाजिक जबाबदारी याबाबतही बालकांना मार्गदर्शन केले जाणार आहे. या उपक्रमामुळे मुलांमध्ये आत्मविश्वास, नेतृत्वगुण आणि सकारात्मक विचारसरणी विकसित होण्यास मदत होणार आहे.

कार्यक्रमास प्रिया शिरोळे, मोनाली कुलकर्णी तसेच मोठ्या संख्येने बालक, पालक व शिक्षक उपस्थित होते. उपस्थितांनी या उपक्रमाचे कौतुक करत, अशा शिबिरांमुळे मुलांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळत असल्याची भावना व्यक्त केली.

## साळवण देवी रोड परिसरात घाणीवरून तणाव

### नागरिकांचा ठिय्या आंदोलन, पालिकेचे लेखी आश्वासन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : श्रीगोंदा शहरातील साळवण देवी रोड परिसरात चिकन विक्रेत्याने दुकानातील कचरा रस्त्यावर टाकल्याने रविवारी रात्री तणावाचे वातावरण निर्माण झाले. रात्री साडेनऊच्या सुमारास घडलेल्या या प्रकारामुळे संतप्त नागरिकांनी संबंधित विक्रेत्याला जाब विचारला. वारंवार सूचना करूनही तो ऐकत नसल्याने युवकांनी एकत्र येत त्याला समज दिली, त्यानंतर त्याने नरमाईची भूमिका घेतली. दरम्यान, सोमवारी सकाळी साडेदहा वाजता परिसरातील युवकांनी एकत्र येत पालिकेच्या अधिकाऱ्यांना घटनास्थळी बोलावून परिस्थितीची पाहणी करून घेतली. अधिकाऱ्यांनी संपूर्ण परिस्थितीची माहिती घेतल्यानंतर नागरिकांनी नगर परिषदेकडे धाव घेतली. मुख्याधिकारी रजेवर असल्याने नागरिकांनी नगराध्यक्ष सुनीताताई खेतमाळीस व उपाध्यक्ष अलकाताई अनभुले यांच्या उपस्थितीत निवेदन सादर केले.

निवेदनात साळवण देवी माता मंदिराच्या मुख्य रस्त्याच्या तोंडाशी मोठ्या प्रमाणावर चिकन दुकाने असल्यामुळे परिसरात घाणीचे साम्राज्य निर्माण झाल्याची तक्रार करण्यात आली. तसेच या ठिकाणी चौकाचे सुशोभीकरण करून 'माता साळवण देवी चौक' असे नामकरण करावे, प्रवेशद्वार उभारावे व मुख्य रस्त्यावर सर्कल निर्माण करावे, अशी मागणी संभाजी ब्रिगेडचे नाना शिंदे यांनी केली. याशिवाय, रात्री कचरा टाकणाऱ्या व्यक्तीवर तसेच संबंधित ट्रस्टच्या अध्यक्षावर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी युवक कार्यकर्ते सागर कोथिंबिरे यांनी निवेदनात केली. नागरिकांनी नगराध्यक्षांच्या दालनात ठिय्या आंदोलन करत लेखी आश्वासन मिळेपर्यंत न हलण्याची भूमिका घेतली. अखेर नगर परिषदेकडून लेखी आश्वासन देण्यात आले. त्यानुसार संबंधित चिकन व मासे विक्रेत्यांना कोणतीही अधिकृत परवानगी देण्यात आलेली नसून, दुकाने ज्या जागेत आहेत ती ट्रस्टची असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

### अहिल्यानगरमध्ये 'समर कॅम्प २०२६'

## विद्यार्थ्यांसाठी सर्वांगीण विकासाची संधी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : विद्यार्थ्यांच्या उन्हाळी सुट्ट्यांचा सदुपयोग व्हावा आणि त्यांच्यातील विविध कौशल्यांचा विकास घडावा या उद्देशाने डान्स युनिव्हर्स इन्स्टिट्यूट व कराळे क्लब यांच्यावतीने 'समर कॅम्प २०२६'चे आयोजन करण्यात आले आहे. हा कॅम्प दि. १० मे ते २५ मे २०२६ या कालावधीत कराळे क्लब हाऊस, न्यू लिंक रोड, सावेडी बसस्थानकाजवळ येथे होणार आहे.



या समर कॅम्पमध्ये विद्यार्थ्यांसाठी विविध क्षेत्रांतील उपक्रमांचा समावेश करण्यात आला असून शारीरिक, मानसिक, सामाजिक व सर्जनशील विकासावर विशेष भर देण्यात आला आहे.

'फिटनेस झोन' अंतर्गत डान्स फिटनेस, झुंबा, स्ट्रेंथ अँड फ्लेक्सिबिलिटी ट्रेनिंग, मजेदार वर्कआउट चॅलेंजेस, ब्रेन जिम तसेच योग, ध्यान व रिलॅक्सेशन यांचा समावेश आहे.

'सोशल अँड लाईफ स्किल्स झोन'मध्ये आत्मविश्वास वाढविण्यासाठी उपक्रम, सार्वजनिक वक्तृत्व व स्टोरीटेलिंग, टीम बिल्डिंग, सोशल मीडिया अवेअरनेस, मनी मॅनेजमेंट बेसिक्स आणि शिस्त व एकाग्रता वाढविण्याचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.

तसेच 'आर्ट अँड क्रिएटिव्ह झोन'मध्ये ड्रॉइंग, पेंटिंग, पेपर क्राफ्ट, मोजॅक आर्ट, टाय अँड डाय, फॅशन डिझाईनिंग, स्क्रॅपबुक आणि विविध सर्जनशील प्रकल्पांचा समावेश आहे. 'गेम्स अँड ॲडव्हेंचर झोन'मध्ये इनडोअर-आउटडोअर खेळ, ॲडव्हेंचर डे, निसर्गभ्रमंती तसेच पूल पार्टी व अक्का डान्ससारखे आकर्षक उपक्रम ठेवण्यात आले आहेत.

याशिवाय 'फन अँड एंटरटेनमेंट झोन'मध्ये रील मेकिंग वर्कशॉप, अभिनय व अभिव्यक्ती खेळ, टॅलेंट शो, थीम डे ॲक्टिव्हिटीज आणि दररोज वेगवेगळ्या मजेदार स्पर्धा आयोजित केल्या जाणार आहेत.

या सर्व उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होणार असल्याचा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. कॅम्पसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू असून पालक व विद्यार्थ्यांनी लवकरात लवकर नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी सागर अलचेट्टी (९६३७१३९५५२) व कुणाल सुर्यवंशी (९३५९०१९२६४) कराळे क्लब (७३८५२२३४२१) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

# 'निमल' झाला हाऊसफुल

## सिद्धार्थ जाधव यांच्या अभिनयाची जादू नाटकातूम 'दत्तू'चा संघर्ष

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : शहरातील नाट्यप्रेमींसाठी खास ठरलेला कबीर इव्हेंट्स आयोजित 'निमल' हा बहुचर्चित मराठी नाटकाचा प्रयोग सावेडी येथील माऊली सभागृहात हाऊसफुल ठरला. सिनेअभिनेता सिद्धार्थ जाधव यांच्या दमदार अभिनयाला नगरकरांनी टाळ्यांच्या कडकडाटात उत्स्फूर्त दाद दिली.

अश्वमी थिएटर्स व ताराराम प्रॉडक्शन निर्मित या नाटकाचे लेखन व दिग्दर्शन महेश मांजरेकर यांनी केले आहे. नाटकातून मुंबईतील चंदेरी दुनियेत आपले नशीब आजमावण्यासाठी आलेल्या 'दत्तू' या तरुणाचा संघर्षमय प्रवास प्रभावीपणे उलगडण्यात आला आहे. गावातून अभिनेता होण्याचे स्वप्न घेऊन मुंबईत आलेल्या दत्तूच्या आयुष्यातील निरागसता, स्वप्ने, अपयश आणि वास्तवाचा सामना यांचा भावनिक पट नाटकातून रंगवण्यात आला आहे. दत्तूची प्रमुख भूमिका साकारणाऱ्या सिद्धार्थ जाधव यांनी शब्दोच्चार, देहबोली आणि भावनिक चढ-उतार यांमधून पात्राला जिवंत केले. त्यांच्या विनोदी प्रसंगांमुळे सभागृहात हास्याचा कल्लोळ उसळला, तर भावनिक प्रसंगांनी प्रेक्षकांना अंतर्मुख केले.

नाटकाचे वैशिष्ट्य म्हणजे इतर पात्रे प्रामुख्याने मूक असूनही, नेपथ्य, प्रकाशयोजना, संगीत आणि हावभाव यांच्या माध्यमातून कथानक अधिक प्रभावी बनवण्यात आले आहे. दत्तूच्या आयुष्यातील प्रत्येक टप्पा ऑडिशनची धडपड, स्वप्नांची आस, अपयशाचा स्वीकार आणि कुटुंबीयांची आठवण अत्यंत



वास्तववादी पद्धतीने साकारली आहे.

'निमल' हे नाटक एका सर्वसामान्य तरुणाच्या स्वप्नांची आणि संघर्षाची कहाणी आहे. 'दत्तू शिंदे' हा खेड्यातून आलेला, मनाने निष्पाप पण जिद्दी तरुण मुंबईत अभिनेता होण्याचे स्वप्न घेऊन येतो. मात्र, चंदेरी दुनियेतील वास्तव, स्पर्धा, नकार आणि मानसिक ताण यांचा सामना करताना त्याचे स्वप्न हळूहळू मृगजळ ठरते.

या नाटकातून समाजातील काही ज्वलंत प्रश्नांवरही भाष्य करण्यात आले. महिलांवरील अत्याचार, लहान मुलींवरील बलात्कार यांसारख्या घटनांच्या पार्श्वभूमीवर माणसातील क्रौर्य अधोरेखित करण्यात आले, तर जनावरांमध्ये जात-धर्म नसतो पण माणूस मात्र विभाजनात अडकला आहे, हा संदेशही प्रभावीपणे देण्यात आला. कोरोना काळातील प्रसंग, तसेच आंतरराष्ट्रीय घडामोडींवर हलक्याफुलक्या शैलीत भाष्य करून प्रेक्षकांना विचार करायला भाग पाडण्यात आले. नाटकात सिद्धार्थ जाधव यांच्यासह सिद्धार्थ साळवी, पंकज पंचारिया, ह्तिका अर्जुन, आदित्य पंढरे, संदीप जुवाटकर यांच्या मूक भूमिका प्रभावी ठरल्या. विशेषतः दत्तूचा 'मूक मित्र' ही भूमिका प्रेक्षकांच्या लक्षात राहणारी ठरली.

मध्यांतरावेळी कबीर इव्हेंट्सच्या वतीने संदीप कुसळकर यांनी सिद्धार्थ जाधव यांचे स्वागत केले. तसेच मुख्य प्रायोजक शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाऊंडेशनचे नरेंद्र फिरोदिया आणि सहप्रायोजक रोझ गोल्ड-ब्रम्हाभोजचे लौकिक शिंगवी यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी संजय गुगळे यांचे सहकार्य लाभले असून, सुरज ढवळे, राम गोल्हार, पृथ्वीराज गोपाळघरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

**द • ख • ल**

# १५ कोटींच्या निधीवरून आळंदी शिवसेनेत 'श्रेयवाद' पेटला

### झोंबाडेंच्या 'सोलो' भेटीने वादाला तोंड

**आळंदी :** तीर्थक्षेत्र आळंदीतील विकासकामांसाठी मंजूर होणाऱ्या १५ कोटी २० लाख रुपयांच्या निधीवरून शिवसेनेत 'श्रेयवादाचा' वाद चिघळला आहे. शिवसेना नगरसेवक सुरेश नाना झोंबाडे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची एकट्याने भेट घेऊन निधी मंजुरीसाठी मागणीपत्र दिल्याने पक्षांतर्गत नाराजी उफाळून आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आळंदीतील विविध विकासकामांसाठी निधी मिळवण्यासाठी शिवसेनेच्या वतीने संयुक्त शिष्टमंडळाद्वारे पाठपुरावा करण्याचे नियोजन झाले होते. आमदार शरद सोनवणे, जिल्हाप्रमुख भगवान पोखरकर, शहरप्रमुख राहुल चव्हाण, नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे व विरोधीपक्षनेते आदित्य घुंडरे यांच्यासह प्रमुख पदाधिकाऱ्यांनी याबाबत चर्चा करून उपमुख्यमंत्री शिंदे यांची एकत्रित भेट घेण्याचे ठरवले होते. मात्र, या नियोजनाला धक्का देत नगरसेवक झोंबाडे यांनी संबंधित नेते व पदाधिकाऱ्यांना पूर्वकल्पना न देता थेट उपमुख्यमंत्र्यांची भेट घेतल्याने पक्षात नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. या कृतीमुळे स्थानिक संघटनेला डावलण्यात आल्याची भावना कार्यकर्त्यांमध्ये व्यक्त होत आहे. शहरप्रमुख राहुल चव्हाण यांनीही या प्रकारावर नाराजी व्यक्त केली. निधीसाठी सर्वांनी मिळून भेट घेण्याचे ठरले होते. मात्र आम्हाला विश्वासात न घेता ही भेट घेण्यात आली, असे त्यांनी सांगितले. दरम्यान, विकासकामांसाठी निधी मिळणे ही सकारात्मक बाब असली, तरी त्यासाठी पक्षांतर्गत समन्वयाऐवजी 'वैयक्तिक श्रेय' मिळवण्याच्या प्रयत्नांमुळे गटबाजी उघड होत असल्याची चर्चा शहरात रंगली आहे. या घडामोडींमुळे आगामी काळात स्थानिक राजकारणात नवे समीकरण तयार होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## जिल्ह्यात ६६ हजाराहून अधिक नागरिकांनी केली स्व-गणना : जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी

**पुणे :** भारताच्या १६ व्या जनगणनेला १ सुरुवात झाली असून अखेर जिल्ह्यातील ६६ हजार १९३ इतक्या नागरिकांनी स्व-गणना केली आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली आहे. जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्याला जिल्ह्यात सुरुवात करण्यात आली नागरिकांनी https://se.census.gov.in या अधिकृत संकेतस्थळाचा वापर करुन १५ मे २०२६ अखेर कालावधीत स्व-गणना पूर्ण करावी. स्व-गणना ही ऐच्छिक आहे. माहिती गोळा करण्यासाठी आणि नोंदविण्यासाठी प्रगणक १६ मे ते १४ जून २०२६ दरम्यान प्रत्येक घराला भेट देणार आहे. यावेळी प्रगणकांद्वारे गृहगणना करण्यात येणार असून नागरिकांनी आपल्याशी निगडित अचूक माहिती त्यांना द्यावी. आपल्या परिसरातील नागरिकांनाही अद्ययावत माहितीसह स्व-गणना करण्यास प्रोत्साहित करावे, जिल्ह्यातील सर्व आपली जबाबदारी मानून या प्रक्रियेत सक्रियपणे सहभाग घ्यावा, असे आवाहन श्री. डुडी यांनी केले आहे.

## जारकरवाडी–लोणी रस्त्यालगत धोकादायक विहिर

### तातडीने सुरक्षात्मक उपायांची मागणी

**लोणी धामणी :** जारकरवाडी (ता. आंबेगाव) येथील जारकरवाडी–लोणी रस्त्यावर भोजणदरा परिसरात मुख्य रस्त्यालगत एक धोकादायक विहीर असून, त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. मंचर–जारकरवाडी–लोणी हा रस्ता वाहतुकीसाठी सोयीस्कर असल्याने येथे मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ असते. रस्ता आणि विहिरीची उंची समान असल्याने कोणत्याही क्षणी अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. हा रस्ता रांजणगाव सणसवाडी औद्योगिक वसाहतीकडे जाण्यासाठीही महत्त्वाचा असून, काही वर्षांपूर्वी या मार्गाचे रुंदीकरण व काँक्रीटीकरण करण्यात आले आहे. त्यामुळे येथे वाहने भरधाव वेगाने धावत असल्याने धोका अधिक वाढला आहे. मात्र, या ठिकाणी सुरक्षेच्या दृष्टीने कोणतीही उपाययोजना करण्यात आलेली नाही.

यामुळे संबंधित विभागाने तातडीने लक्ष घालून विहिरीभोवती उंच कठडे, संरक्षणात्मक भिंत, झाकण किंवा जाळी बसवावी, तसेच रात्रीच्या वेळी परावर्तक फलक किंवा प्रकाशयोजना करावी, अशी मागणी प्रवाशांकडून केली जात आहे.



## वनपट्टा धारक शेतकऱ्यांच्या फार्मर आयडी नोंदणीचे आवाहन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :-** राज्यात अँग्रीस्टॅक योजनेअंतर्गत वनपट्टे धारक शेतकऱ्यांची फार्मर आयडी नोंदणी करण्याचे काम सुरू असून या प्रक्रियेला अधिक गती देण्याचे निर्देश शासन स्तरावरून देण्यात आले आहेत. कृषी व पशुसंवर्धन विभागाच्या शासन निर्णयानुसार सर्व जिल्ह्यांनी या मोहिमेला प्राधान्य देऊन कार्यवाही करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. वनपट्टे धारक शेतकऱ्यांच्या नोंदणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालये, उपविभागीय अधिकारी तसेच कृषी विभाग यांच्यामार्फत समन्वयाने काम सुरू आहे. राज्यातील विविध जिल्ह्यांमधून वनपट्टे धारक शेतकऱ्यांची फार्मर आयडी नोंदणी सुरू असून ४ मे २०२६ पर्यंत प्राप्त अहवालानुसार एकूण २८०५ शेतकऱ्यांची नोंदणी पूर्ण करण्यात आली आहे. तथापि, काही जिल्ह्यांमध्ये नोंदणीचा वेग अपेक्षेपेक्षा कमी असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे संबंधित जिल्हा प्रशासनाने विशेष मोहीम राबवून शिल्लक शेतकऱ्यांची नोंदणी तत्काळ पूर्ण करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच, ग्रामीण भागात जनजागृती करून वनपट्टे धारक शेतकऱ्यांना फार्मर आयडी नोंदणीचे महत्त्व समजावून सांगणे आवश्यक असून, नजीकच्या सुविधा केंद्रांमार्फत सदर नोंदणी प्रक्रिया करणेबाबत वनपट्टा धारक शेतकऱ्यांना प्रोत्साहित करावे. सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने कार्य करून अँग्रीस्टॅक अंतर्गत फार्मर आयडी नोंदणी मोहीम यशस्वी करावी, असे आवाहन कृषी आयुक्तालयाचे संचालक (अॅग्रीस्टॅक) अंकुश माने यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.

# जुळ्या भावंडांचा पाझर तलावात बुडून मृत्यू

### जुन्नर तालुक्यातील तळेरान येथे हृदयद्रावक घटना

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**जुन्नर :** तालुक्यातील वसईवाडी (ता. जुन्नर) येथील तळेरान गावात अत्यंत दुर्दैवी व मन हेलावून टाकणारी घटना घडली असून साबळे कुटुंबातील जुळी भावंडे कु. श्रावणी रामदास साबळे व कु. गणेश रामदास साबळे यांचा पाझर तलावात बुडून मृत्यू झाल्याने संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, साबळे कुटुंबीय दैनंदिन कामासाठी कपडे धुण्यासाठी गावाजवळील पाझर तलावावर गेले होते. यावेळी कुटुंबीय आपल्या कामात व्यस्त असताना ही दोन्ही लहान मुले तलावाच्या काठावर खेळत होती. खेळता खेळता ती पाण्यात उतरली असता अचानक खोल पाण्याचा अंदाज न आल्याने दोघेही बुडाल्याची घटना घडली. काही वेळाने मुले दिसेनाशी झाल्याने कुटुंबीयांनी शोधाशोध सुरू केली असता ही बाब लक्षात आली. तत्काळ ग्रामस्थांच्या मदतीने त्यांना बाहेर काढण्यात आले; मात्र तोपर्यंत खूप उशीर झाला होता. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने घटनास्थळी धाव घेतली. या घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त होत असून प्रत्येकाच्या डोळ्यात पाणी आले आहे. या घटनेने संपूर्ण तळेरान गाव शोकमग्न झाले आहे. मृत श्रावणी व गणेश ही दोन्ही जुळी भावंडे इयत्ता चौथीत शिक्षण घेत होती. ते न्यू इंग्लिश स्कूल, घोडेगाव येथील विद्यार्थी असून अभ्यासात हुशार, नम्र व सर्वांशी मिळून मिसळून राहणारी अशी त्यांची ओळख होती. त्यांच्या अकाली निधनामुळे शाळेतही शोककळा पसरली असून शिक्षक व विद्यार्थ्यांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे.



दरम्यान, अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी जलस्रोतांच्या ठिकाणी योग्य सुरक्षेची उपाययोजना करणे, तसेच लहान मुलांवर सतत लक्ष ठेवणे गरजेचे असल्याची भावना ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे. स्थानिक प्रशासनानेही या घटनेची दखल घेऊन आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी मागणी होत आहे. या दुर्दैवी घटनेमुळे साबळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून संपूर्ण गावातून शोकसंवेदना व्यक्त केल्या जात आहेत.

## आळंदीत 'कर बॉम्ब'चा स्फोट ; वाढीव मालमत्ता कराविरोधात नागरिक आक्रमक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी :** आळंदी नगरपरिषदेने राबविलेल्या नवीन मालमत्ता कर आकारणीमुळे शहरात संतापाची लाट उसळली असून, हा विषय आता थेट वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. अचानक झालेल्या भरमसाठ करवाढीविरोधात राष्ट्रवादीच्या नगरसेविका उज्ज्वला दीपक काळे यांनी मुख्याधिकाऱ्यांना लेखी हरकतीचे पत्र देत प्रशासनाला जाब विचारला आहे. नगरपरिषदेकडून नुकतीच मालमत्ता कराची पुनर्रचना करण्यात आली असून, त्यानुसार नागरिकांना नवीन कर आकारणीच्या नोटिसा पाठविण्यात आल्या आहेत. मात्र, या वाढीव कराचे निकष नेमके काय आहेत, याबाबत प्रशासनाकडून कोणतेही स्पष्ट स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. विशेषतः व्यावसायिक (कमर्शियल) मालमत्तांच्या कर गणनेत कोणती पद्धत वापरण्यात आली, याबाबत नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. सध्याच्या आर्थिक परिस्थितीत एवढी मोठी करवाढ सर्वसामान्य नागरिकांना परवडणारी नसल्याचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे आळंदीकरांमध्ये नाराजी वाढत असून, अनेक ठिकाणी संताप व्यक्त केला जात आहे. या पार्श्वभूमीवर नगरसेविका उज्ज्वला काळे यांनी दिलेल्या पत्रात, कर आकारणीचे निकष तातडीने जाहीर करावेत, व्यावसायिक मालमत्तांच्या कर गणनेचा खुलासा करावा आणि वाढीव कराचे पुनर्मूल्यांकन करून तो कमी करावा, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. तसेच ही करवाढ तात्काळ रद्द करावी, अशीही मागणी पुढे आली आहे. दरम्यान, या प्रकरणावर नगरपरिषद प्रशासन कोणती भूमिका घेते, याकडे संपूर्ण आळंदीकरांचे लक्ष लागले असून, नागरिकांना दिलासा मिळणार की संघर्ष अधिक तीव्र होणार, हे येत्या काही दिवसांत स्पष्ट होणार आहे.



## ३१ मेपर्यंत पाणीकपात रद्द – महापौरांचे निर्देश ,मान्सूनपूर्व पाणीपुरवठा नियोजन आढावा बैठक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** आगामी मान्सूनच्या पार्श्वभूमीवर पुणे महानगरपालिका हद्दीतील पाणीपुरवठा सुरळीत राहावा यासाठी आज माननीय महापौर यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. या बैठकीत महापौरांनी ३१ मेपर्यंत पाणीकपात रद्द करण्याचे स्पष्ट निर्देश दिले. बैठकीत शहरातील विद्यमान पाणीसाठा, जलशुद्धीकरण व्यवस्था, वितरण प्रणाली तसेच संभाव्य पाणीटंचाईच्या उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. पुणे शहराला पानशेत, वरसगाव, टेमघर व खडकवासला या धरणांमधून पाणीपुरवठा होत असून, सध्याच्या साठ्याचा आढावा घेण्यात आला. भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार यंदा पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता लक्षात घेऊन आवश्यक नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. पाणी गुणवत्तेबाबत पर्वती जलकेंद्र प्रयोगशाळेमध्ये दरमहा अनेक नमुन्यांची तपासणी करण्यात येत असून, थक्ज व उझक्एएज मार्गदर्शक तत्त्वांनुसार गुणवत्ता राखली जात आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर जलशुद्धीकरण केंद्रांमध्ये क्लोरीनेशन प्रक्रिया सक्षम ठेवण्यात आली असून, आवश्यक रसायनांचा (झअउ व क्लोरीन) पुरेसा साठा उपलब्ध ठेवण्यात आला आहे.

शहरातील १७ जलशुद्धीकरण प्रकल्पांची देखभाल, क्लेरीफायर व फिल्टर बेडची स्वच्छता तसेच यंत्रणांची दुरुस्ती पूर्ण करण्यात आली आहे. पावसाळ्यात वाढणाऱ्या गढूळपणाच्या पार्श्वभूमीवर पाणी शुद्धीकरण प्रक्रिया अधिक प्रभावी करण्यासाठी विशेष उपाययोजना राबविण्यात येत आहेत. समान पाणीपुरवठा योजनेअंतर्गत जुन्या हद्दीसोबतच नव्याने समाविष्ट गावांमध्ये पायाभूत सुविधा उभारण्याचे काम सुरू असून, त्यामध्ये जलशुद्धीकरण केंद्र, पंपिंग स्टेशन, पाण्याच्या टाक्या व वितरण लाईन उभारण्यात येणार आहेत. तसेच, पाणीपुरवठा व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी अख आधारित लीक डिटेक्शन, रोबोटिक कॅमेरा तपासणी, वाहन ट्रॅकिंग प्रणाली व मोबाईल ॲपद्वारे नियंत्रण यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे.

## नसरापूर घटनेतील आरोपीला फाशीची शिक्षा द्यावी

**माळेगाव पोलिस ठाण्यास विविध संघटनेच्या वतीने निवेदन..!**

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**माळेगाव ता: बारामती :** माळेगाव शहरातील विविध राजकीय पक्ष व सामाजिक संघटनांच्या वतीने नसरापूर घटनेतील आरोपीला फाशीची शिक्षा देण्यात यावी अशी मागणी निवेदनाद्वारे माळेगाव पोलिस ठाण्यास करण्यात आली असून या निवेदनाचा स्विकार उपनिरीक्षक शरद तावरे यांनी केला. नसरापूर ता. भोर येथे कांबळे नावाच्या नराधमाने चार वर्षिय बालिकेवर अत्याचार करुन तिची निर्घृण हत्या केली होती. या घटनेमुळे संपूर्ण राज्यात संतापाची लाट उसळली असून नराधमास



तात्काळ फाशी देण्यात यावी अशी राज्यात जोर धरत आहे. माळेगाव शहरातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (दोन्ही गट), बहुजन हक्क परिषद, रिपाई, मुस्लिम संघटना, बौद्ध युवक संघटना, युवा शक्ती संघटना यांच्या वतीने नराधमाला तात्काळ फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनावर बहुजन हक्क परिषदेचे जिल्हाध्यक्ष केशवराव भोसले, माजी सभापती संजय भोसले, तालुका अध्यक्ष बाबा घोडके, रिपाईचे तालुका युवकाध्यक्ष विश्वास भोसले, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे युवा अध्यक्ष मयुर भोसले, मुस्लिम संघटनेचे रियाज शेख, माजी सदस्य रुपेश भोसले, पिनु खरात , सुनील भोसले, प्रा. किशोर भोसले, राहुल भोसले यांच्यासह इतरांच्या सह्या आहेत.

## पालखी सोहळ्यासाठी मनपाचा 'मास्टर प्लॅन'

### सुरक्षित, शिस्तबद्ध आयोजनासाठी सर्व यंत्रणा सज्ज

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळा २०२६ च्या पार्श्वभूमीवर पुणे महानगरपालिका भवनात मंगळवारी महत्त्वाची नियोजनात्मक आढावा बैठक पार पडली. महापौर मंजुषाताई नागपुरे आणि आयुक्त नवलकिशोर राम यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या बैठकीत सोहळा सुरळीत, सुरक्षित आणि भक्तिमय वातावरणात पार पाडण्यासाठी विविध बाबींवर सखोल चर्चा करण्यात आली.



वारकरी संप्रदायाच्या परंपरेला साजेसा आणि शिस्तबद्ध सोहळा घडवण्यासाठी पालखी मार्गावरील स्वच्छता, पाणीपुरवठा, आरोग्य सुविधा, वाहतूक व्यवस्था आणि सुरक्षेच्या उपाययोजनांवर विशेष भर देण्यात आला. तसेच वारकऱ्यांसाठी निवास व विश्रांती व्यवस्था सक्षम करण्यासोबत आपत्कालीन सेवांची तयारी आणि सर्व विभागांमधील समन्वय अधिक बळकट करण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या.

बैठकीस उपमहापौर परशुराम वाडेकर, सभागृहनेते गणेश बीडकर, स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले, अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर, ओमप्रकाश दिवटे, प्रजित नायर, सहाय्यक आयुक्त रंजन कुमार, पोलिस उपायुक्त हिंमत जाधव आदी अधिकारी उपस्थित होते. तसेच ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीचे प्रमुख विश्वस्त डॉ.भावार्थ देखने, पालखी सोहळाप्रमुख अॅड.राजेंद्र उमाप, देहू संस्थानचे ह.भ.प. उमेश मोरे, दिंडी संघटनांचे प्रतिनिधी भाऊ महाराज फुरसुंगीकर, सोहळामालक राजेंद्र आरफडकर, विश्वस्त रोहिणी पवार, राजाभाऊ भुजबळ यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारीही उपस्थित होते. सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी प्रशासन आणि वारकरी प्रतिनिधींमध्ये समन्वय राखत नियोजनाची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्यावर बैठकीत एकमत झाले.

## सफाई कर्मचाऱ्यांसाठी मॉडेल स्वरुपात दिशादर्शक काम करावे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** सफाई कर्मचाऱ्यांच्या समाजाच्या मुख्य प्रवाहात आण्याकरिता केंद्र व राज्यशासन मिळून काम करीत आहेत; त्यामुळे पुणे जिल्ह्यातही सफाई कर्मचाऱ्यांच्या पुर्नवसनाकरिता मॉडेल स्वरुपात दिशादर्शक काम करावे , या मॉडेलची अंमलबजावणी राज्यात करण्यात येईल, असे निर्देश महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग रुक्कानसिंग डागोर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालय येथे सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्या व अडीअडचणी निवारण करण्याकरिता केलेल्या उपाययोजनांबाबत आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी तसेच विविध संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

श्री. डागोर म्हणाले, सफाई कर्मचाऱ्यांच्या कल्याणाकरिता घरकुल, आरोग्य, शिक्षण, रोजगार आदी विषयांशी निगडित असलेल्या विविध कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी. लाड - पागे समितीच्या शिफारशीनुसार वारसा हक्काने भरावयांच्या पदांबाबतची कार्यवाही गतीने पूर्ण करावी. नगर विकास विभागाचे २२ ऑक्टोबर २००८ रोजीच्या शासन निर्णयानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजना लागू करण्यात आली असल्याने या आदेशाच्या दिनांकानंतर सेवानिवृत्त झालेल्या सफाई कामगारांची सेवा २५ वर्षे किंवा त्याहून अधिक झाली आहे असे सफाई कामगार आणि २२ ऑक्टोबर २००८ नंतर सेवेत असलेले जे सफाई कामगार मृत्यू झाले आहेत अशा मृत सफाई कामगारांच्या पात्र वारसांना घरे उपलब्ध करुन देण्यात यावी.

केंद्र व राज्यशासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांचा लाभ देण्याकरिता शिबीरांचे आयोजन करावे. शिबीरे आयोजित करतांना सफाई कामगार क्षेत्रात कार्यरत अधिकृत संघटनांसोबत सोबत घ्यावे. विविध लोककल्याणकारी योजनांची व्यापक स्वरुपात जनजागृती करावी. कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना आरोग्य सेवांचा लाभ कॅशलेस सुविधांचा लाभ देण्याची कार्यवाही करावी. सफाई कर्मचाऱ्यांशी निगडित प्रलंबित मार्गी लावून तसा अहवाल आयोगाकडे सादर करावा, अशा सूचना श्री. डागोर यांनी दिल्या.

श्री. डुडी म्हणाले, सफाई कर्मचारी आयोगाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे जिल्ह्यात काम करण्यात येईल. यापूर्वीच्या बैठकीत देण्यात आलेल्या निर्देशाप्रमाणे सर्व संबंधित विभागाने केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल लवकरात लवकर आयोगाकडे सादर करावा, असेही श्री. डुडी म्हणाले.

# विवाहित मुलीचे अपहरण

### वडिलांसह सात जणांवर गुन्हा दाखल : पारगाव पोलिसांनी चार तासात केले जेरबंद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**निरगुडसर :** आंबेगाव तालुक्यातील पारगाव परिसरात एक धक्कादायक घटना उघडकीस आली असून विवाहित मुलीचे तिच्याच वडिलांनी इतर साथीदारांसह अपहरण केल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणात पोलिसांनी तातडीने कारवाई करत अवघ्या चार तासांत सर्व ७ आरोपींना अटक केली आहे. दि. ०४ मे २०२६ रोजी रात्री सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास सौ. साक्षी विशाल भागवत (रा. पारगाव, लबडे मळा, ता. आंबेगाव, जि. पुणे) या त्यांच्या सासरच्या व्यक्तीसोबत असताना ही घटना घडली. पीडितेच्या वडिलांसह अन्य सहा जणांनी तिला मारहाण करत, शिवीगाळ व दमदाटी करून जबरदस्तीने एका वाहनात टाकून अपहरण केले. या अपहरणामागील




उद्देश फिर्यादीस जबरदस्तीने दुसरे लग्न लावून देण्याचा असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. घटनेची माहिती मिळताच पारगाव कारखाना पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक सचिन कांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाने तात्काळ हालचाल सुरू केली. पोलिसांनी वेगवेगळ्या ठिकाणी शोधमोहीम राबवत अवघ्या ४ तासांच्या आत सर्व आरोपींना अटक करण्यात यश मिळवले. या प्रकरणी पारगाव कारखाना पोलीस ठाण्यात १) शिवाजी भाऊ खाटेकर (वय ४५, रा. पारगाव, ता. आंबेगाव,) अमोल चांगदेव रोडे (वय ३३), सचिन रावसाहेब रोडे (वय २९), अक्षय विश्वनाथ वाडगे (वय २९), अभिजीत बारकू रोडे (वय २६), नंदकिशोर विलास तितर (वय ३२, सर्व रा. नांदूर खंदरमाळ, ता. संगमनेर, जि. अहमदनगर), जयश्री अशोक कुदनर (वय ३५, रा. साकोर, ता. संगमनेर, जि. अहील्यानगर) यांना अटक करत त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल, अपर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पारगाव पोलीस ठाण्याचे सहा. पोलीस निरीक्षक सचिन कांडगे, पोलीस उपनिरीक्षक भाउसाहेब लोकरे, पोलीस हवालदार अविनाश कालेकर, सचिन डामसे, पोलीस अंमलदार संजय साळवे, मंगेश अंभग, चंद्रकांत गव्हाणे, प्रशांत जगताप व महिला पोलीस अंमलदार काजल फलके यांनी केली.

# सौर ऊर्जा पॅनल व विद्युत साहित्य भेट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** जागतिक सौर ऊर्जा दिवसाचे औचित्य साधून भवानी पेठेतील श्री शिवाजी मित्र मंडळाच्या वतीने ग्रामीण व दुर्गम भागातील दोन संस्थांना एक लाख रुपये किमतीचे सौर ऊर्जा पॅनल व विद्युत लाइट्स भेट दिले.

गणेशोत्सवात मंडळाने 'स्वतःची वीज, स्वतःचा प्रकाश' हा वैज्ञानिक देखावा सादर केला होता. मंडप संपूर्ण सौर ऊर्जेवर उजळण्यात आला होता. तोच प्रकल्प आता सामाजिक कार्यात रूपांतरित करत मंडळाने हा उपक्रम राबवला.

भोर येथील निवासी मूक-बधिर शाळा, राजा रघुनाथराव विद्यालय आणि मुळशी येथील सूर्योदय सोशल फाउंडेशन या संस्थांना सौर विद्युत प्रकल्प सुपूर्द करण्यात आले. संस्थेच्या प्रमुख रोहिणी दीक्षित यांनी हे साहित्य स्वीकारले.

यावेळी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंडळाचे कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, गणेशोत्सव अभ्यासक आनंद सराफ, शिल्पकार विवेक खटावकर, पर्यावरण तज्ज्ञ डॉ. श्रीकांत गबाले, मंडळाचे अध्यक्ष प्रल्हाद थोरात, साईनाथ मंडळ ट्रस्टचे पीयूष शाह यांच्या हस्ते साहित्य प्रदान करण्यात आले.

ग्रामीण भागात वारंवार वीजपुरवठा खंडित होतो. या सौर पॅनलमुळे सहा तासांपर्यंत त्या आश्रमशाळेला व संस्थेला अखंड वीज उपलब्ध होणार आहे, अशी माहिती शाह यांनी दिली.

महेश सूर्यवंशी म्हणाले, गणेशाची भक्ती करताना अध्यात्मासोबत विज्ञानाची जोड देणे व फक्त उत्सवात प्रबोधन न करता ते कृतीत आणणे, हे मंडळाचे कार्य उल्लेखनीय आहे.

डॉ. गबाले म्हणाले, सौर ऊर्जा ही अक्षय, शाश्वत व स्वच्छ ऊर्जेचा स्रोत आहे. ग्लोबल वॉर्मिंगला उत्तर व आत्मनिर्भर आणि विकसित भारतासाठी हे छोटेसे पण खूप महत्त्वाचे पाऊल आहे.



आनंद सराफ म्हणाले, पूर्व भागात काम करणाऱ्या या मंडळाचे कार्य आदर्शवत आहे. गणेशोत्सवानंतरही वर्षभर आपली सामाजिक बांधिलकी जपत आहे, देखावा आणि उत्सव या भागात जगवण्याचे हेच खरे गणेशकार्य आहे.

विवेक खटावकर म्हणाले, गणेशोत्सवात सादर केलेला देखावा गणेशोत्सवानंतर समाजकार्यात परावर्तित करणे, या कृतीशीलतेचे कौतुक करावे तेवढे कमी आहे.

याप्रसंगी जय गणेश व्यासपीठाचे सचिन पवार, विक्रम गोगावले, कुणाल पवार, किरण सोनिवाल, अजिंक्य भुजबळ, सुधीर ढमाले, अक्षय मारणे तसेच श्री शिवाजी मित्र मंडळाचे गणेश गोळे, ऋत्विक आदमुलवार, सुधीर आदमुलवार, गोविंदा वरंदाणी आदी कार्यकर्ते व शिक्षक रोहिणी दीक्षित, केंगले वाय. एम., साबळे वाय. एम. उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार पीयूष शाह यांनी मानले.

द-ख-ल



## कलाशिक्षक अभिषेक उदमले यांनी मोर पक्षाला दिले जीवदान

**लिंपणगाव** : कर्जत तालुका भैरोबा वाडी रस्त्यावर कुटुंबासह बाबुळगावला निघालेलो असताना अचानक रस्त्याच्या बाजूला जखमी अवस्थेतील मोर दिसला. मोराच्या डोळ्यावरती कोणत्यातरी पक्षाने हल्ला केल्यामुळे मोराचे डोळे पूर्णपणे जखमी झाल्यामुळे त्याला काही दिसत नव्हते. अशा परिस्थितीमध्ये कला शिक्षक अभिषेक उदमले व सामाजिक कार्यकर्ते सुनील यादव यांनी मोराला अलगद पकडून ताबडतोब वनाधिकारी चित्रा शीद यांना स्वतः कलाशिक्षक अभिषेक उदमले यांनी या घटनेचा तपशील फोनवर कळवण्यात आले. थोड्याच वेळात वन अधिकारी चित्रा शीद यांची गाडी घटनास्थळी आली नंतर या मोराला पाणी पाजून सुखरूप त्यांच्याकडे सुपूर्त करण्यात आले. या त्यांच्या धाडसी स्वभावामुळे निश्चितच प्राणी मित्रावर जीवापाड प्रेम दिसून आले.



## विद्यार्थी जीवनातील बारावीचे वर्ष हे भविष्याची दिशा ठरवणारे : प्रा. आढाव

**शेवगाव** : विद्यार्थी जीवनातील बारावीचे वर्ष हे अत्यंत महत्त्वाचे, आव्हानात्मक आणि भविष्याची दिशा ठरवणारे असते. कठोर परिश्रम, सातत्य, जिद्द आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर आपल्या विद्यार्थ्यांनी आज यशाचे शिखर गाठले आहे. हे यश केवळ गुणांचे नसून, त्यांच्या मेहनतीचे, पालकांच्या त्यागाचे आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाचे फलित आहे असे प्रतिपादन प्रा. सुनील आढाव यांनी केले. येथील पसायदान संस्थेने आयोजित केलेल्या इयत्ता १२ वी मधील गुणवंत विद्यार्थी गौरव समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून आढाव बोलत होते. व्यासपीठावर अजय वजन व पालक प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी आढाव म्हणाले आज मिळालेला हा सन्मान तुमच्या नव्या यशस्वी प्रवासाची सुरुवात आहे. यश मिळवताना नम्रता, संस्कार आणि समाजाप्रती जबाबदारी यांचे भान ठेवणेही तितकेच महत्त्वाचे आहे. आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजहितासाठी करून देशाच्या प्रगतीत योगदान द्या. स्वप्न मोठे ठेवा, मेहनत प्रामाणिक करा आणि यश तुमच्या पावलांशी नक्कीच येईल. यावेळी प्रमुख उपस्थितांच्या हस्ते स्नेहल कळमकर ८९.८३ %, तन्वी मोरे ८७.८३ %, प्रतिक्षा शितोळे ८४ %, भार्गवी जाधव ८१.६७ %, श्रेया कळमकर ७७.७२ %, अभिषेक मोहिते ७४.८७ %, श्रावणी दिवटे ७४.३४ %, वैष्णवी गुंड ७४.३३ %, प्रथमेश आंधळे ७३.५० %, मुकुंद खंबाट ७३.५० %, अनुश्री बिहाणी ७०.८३ % गुण मिळवलेल्या पालक व विद्यार्थ्यांचा सन्मान चिन्ह, गुलाब पुष्प व शाल देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांनींनी व पालकांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार प्रा. अभिजित आरे यांनी मानले. प्रा. बी.एस. चितळे, प्रा. एम.एच. मोरे, प्रा. ए. एस. पठाण यांनी कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन केले.



## करंजी घाटात थार आणि पेरिक्षाची धडक : ॲपे रिक्षा चालक ठार

**करंजी** : नगर –पाथर्डी महामार्गावर महेंद्रा थार आणि ॲपे रिक्षाची जोरदार धडक होऊन झालेल्या अपघातात पेरिक्षाचा चालक यशवंत पुरी हा जागीच ठार झाला. तर थार गाडीतील एक जण जखमी झाला. हा अपघात एवढा भयानक होता की, ॲपे गाडीचा अक्षरश : चक्काचुर झाला. आज सकाळी नगर ते पाथर्डी महामार्गावरील करंजी घाटात भरधाव वेगाने नगरहुन पाथर्डीकडे जात असलेल्या महेंद्राथार (क्र. एम एच १२–झेड एल ७२५०) गाडीची आणि नगरकडे जात असलेल्या पेरिक्षाची (क्र. एम एच १२–टी यु–४५०६ ) वळणाचा अंदाज न आल्याने जोरदार धडक होऊन झालेल्या अपघातात पेरिक्षाचा चालक यशवंत बन्सी पुरी (रा. पुणे) हा जागीच ठार झाला. हा अपघात एवढा भिषण होता की, पेरिक्षाचा जागीच चक्काचुर झाला होता. रस्त्यावर रक्ताचा सडा पाहुन प्रवाशी मात्र निघुन जात होते. अपघातानंतर सुदैवाने थार गाडी डोंगराच्याकडेला खड्ड्यात गेली. व थार गाडीतील एक जण जखमी झाला. अपघाताची माहिती मिळताच करंजी औटपोस्टचे पोलिस कर्मचारी अल्ताफ शेख यांनी घटनास्थळी जाऊन अपघातग्रस्तांना मदत केली. सदर घटनेचा गुन्हा पाथर्डी पोलिस स्टेशनला दाखल झाला असुन पुढील तपास पोलिस करीत आहेत.

# शेवगाव तहसीलसमोर सावली दिव्यांग संघटनेचा ठिय्या

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**शेवगाव** : एप्रिल महिन्यात दिव्यांग बांधवांची पेन्शन जमा न झाल्यामुळे सावली दिव्यांग संघटना शेवगाव तालुका व तालुक्यातील दिव्यांग बांधवांच्या वतीने दि. ४ मे २०२६ रोजी शेवगाव तहसील कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्यात आले.

सावली दिव्यांग संघटनेचे संस्थापक अध्यक्ष बाबासाहेब महापुरे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शेवगाव तालुका अध्यक्ष चांद शेख यांच्या नेतृत्वात हे आंदोलन पार पडले. यावेळी संघटनेचे पदाधिकारी नवनाथ औटी, गणेश महाजन, बाबासाहेब गडाख, गणेश तमाणके, अनिल विघ्ने, संदीप चेडे, खलील शेख, कांताराम तमानके, योगेश सोनवणे, महादेव काटे, शिवाजी आहेर, दत्तात्रय घोरताळे, किशोर मडके, रमेश भागवत, सुनील वाळके, गणेश तिकोणे,अंकुश दारुणकर, आझाद शेख, फतरू पठाण, कार्तिक आपशेटे, ताराचंद पिवळ, गणेश गायके,भाग्यश्री गांधी,अनिता पवार, हिरा मिसाळ, संगीता घुले यांच्यासह मोठ्या संख्येने दिव्यांग बांधव उपस्थित होते.

यावेळी आंदोलनकर्त्यांनी सावली दिव्यांग संघटनेचा विजय असो तसेच दिव्यांगांची थकीत पेन्शन मिळालीच पाहिजे अशा जोरदार घोषणा देत प्रशासनाचे लक्ष वेधले. शासनाकडून मिळणारी पेन्शन ही दिव्यांग बांधवांच्या उदरनिर्वाहाचे मुख्य साधन असून, पेन्शन न मिळाल्यामुळे त्यांना मोठ्या आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याची भावना यावेळी सावली दिव्यांग संघटनेचे अध्यक्ष चांद शेख यांनी व्यक्त करण्यात आली.

आंदोलनकर्त्यांनी प्रभारी तहसीलदार माननीय श्री निलेश वाघमारे यांना निवेदन देत तात्काळ थकीत पेन्शन जमा करण्याची मागणी केली. तसेच भविष्यात अशी समस्या उद्भवू नये यासाठी योग्य ती उपाययोजना करण्याची मागणीही करण्यात आली.

दरम्यान, मा. श्री निलेश जी वाघमारे प्रभारी तहसीलदार शेवगाव या मागण्यांची दखल घेऊन लवकरात लवकर कार्यवाही करण्याचे आश्वासन दिल्याचे सांगण्यात आले.

दिव्यांग सक्षमीकरण विभागाचे प्रामाणिक व कर्तव्यदक्ष तत्कालीन सचिव आदरणीय तुकारामजी मुंडे साहेब यांना पुन्हा दिव्यांग सक्षमीकरण विभाग सचिव पदी नियुक्ती करावी अशी मागणी सर्व दिव्यांग बांधवाकडून करण्यात आली आहे.

### एकीकडे बैठकीचे फोटो.. दुसरीकडे झालेल्या निर्णयाची पोस्ट ...

# कर्जतकर अडीच तास अंधारात !

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**कर्जत : कर्जत–जामखेड तालुक्यातील नागरिकांना अखंडित व सुरळीत वीज पुरवठा मिळावा यासाठी तातडीने परिणामकारक उपाययोजना अंमलात आणाव्यात यासाठी विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी अहिल्यानगरला महावितरणची बैठक मंगळवारी घेतली. यासह १ मे महाराष्ट्र दिनी आमदार रोहित पवार यांनी याच प्रश्नांवर अधिकाऱ्यांना धारेवर धरले.**

यावर दोन्ही लोकप्रतिनिधींना अधिकाऱ्यांनी योग्य तोडगा काढून दिलासा देऊ अशी उत्तरे दिली. त्याच दिवशी म्हणजे मंगळवारी कर्जत शहर तब्बल दोन ते तीन तास अंधारात राहिले हे विशेष.

सध्या उन्हाळ्याचे दिवस असून सर्वसामान्य नागरिक उष्णतेने हैराण होत आहे. नागरिकांसह सर्वसामान्य शेतकरी देखील विजेच्या भारनियमनाने त्रस्त असून अखंडित वीज पुरवठा व्हावा.

तसेच ज्या ठिकाणी भारनियमन अधिक होत आहे त्याची वेळ कमी करून शेती आणि पशुपालक यांना सोयीस्कर असणाऱ्या वेळेत योग्य दाबाने वीजपुरवठा करावा अशी मागणी विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी मंगळवारी अहिल्यानगर शासकीय विश्रामगृह येथे स्थानिक पदाधिकारी आणि महावितरणच्या जिल्हा व दोन्ही तालुक्यातील अधिकाऱ्यांची बैठक पार पाडली.

तत्पूर्वी १ मे महाराष्ट्र दिनी आमदार रोहित पवार यांनी देखील कर्जत–जामखेडच्या शेतकऱ्यांसोबत घेत कर्जत कार्यालयावर ठिय्या आंदोलन देत लक्ष वेधले होते.

या दोन्ही लोकप्रतिनिधींना महावितरणच्या अधिकाऱ्यांनी मतदारसंघातील नागरिकांना दिलासा देऊ असे आश्वासन दिले.

मात्र ज्या दिवशी बैठक झाली आणि निर्णय झाला त्याच दिवशी (५ मे, मंगळवारी) कर्जत शहरात तब्बल अडीच ते तीन तास वीज गुल झाली. दोन्ही लोकप्रतिनिधींच्या कार्यकर्त्यांनी नेत्यांच्या बैठकीचे फोटो आणि झालेला निर्णय व्हायरल केला.

त्या दिवशीच कर्जतकर तब्बल अडीच तास अंधारात राहिले ही शोकांतिका म्हणावी लागेल.

### अमेरिका इराण तणावाचा बहाना

# श्रीगोंद्यात व्यापाऱ्याकडून शेतकऱ्यांची लूट ?

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : अमेरिका–इराण तणावाच्या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय बाजारात निर्माण झालेल्या अनिश्चिततेचा परिणाम स्थानिक पातळीवर दिसून येत असून, याच परिस्थितीचा फायदा घेत काही व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक सुरू असल्याच्या तक्रारी वाढू लागल्या आहेत. श्रीगोंद्यात खते, बियाणे, कीडनाशके तसेच शेतीसाठी लागणाऱ्या अनेक वस्तुंच्या दरात अचानक वाढ झाल्याने उत्पादन खर्चात मोठी भर पडत आहे. मात्र या दरवाढीमागे प्रत्यक्ष पुरवठा साखळीतील वाढीव खर्चापेक्षा युद्धजन्य परिस्थिती हा बहाणा अधिक असल्याचा आरोप शेतकरी वर्गातून होत आहे.स्थानिक बाजारात काही ठिकाणी साठेबाजी करून कृत्रिम टंचाई निर्माण केली जात असल्याचेही समोर येत आहे. आताच खरेदी करा, पुढे दर वाढणार अशा पद्धतीने शेतकऱ्यांवर दबाव टाकला जात असल्याचे प्रकार घडत आहेत. परिणामी आधीच आर्थिक अडचणीत असलेला शेतकरी अधिकच संकटात सापडला आहे.दरम्यान, शेतमालाला अपेक्षित भाव मिळत नसताना इनपुट खर्चात होत असलेली वाढ ही चिंताजनक बाब ठरत आहे. त्यामुळे शेती व्यवसायातील नफा घटत असून शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडत आहे.या पार्श्वभूमीवर कृषी विभाग आणि पुरवठा प्रशासनाने बाजारातील दरवाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठी तातडीने तपासणी मोहीम राबवावी, साठेबाजी करणाऱ्यांवर कारवाई करावी, तसेच शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शेतकरी संघटनांकडून करण्यात येत आहे. तसेच यामध्ये प्रशासनाच्या हस्तक्षेपाची अपेक्षा शेतकरी वर्गातून होत आहे . त्यामुळे बाजारातील अनियमितता रोखण्यासाठी आणि शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी संबंधित यंत्रणांनी त्वरित लक्ष घालणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त होत आहे.

युद्धामुळे याचे दर वाढले अमेरिका–इराण तणावाच्या पार्श्वभूमीवरपेट्रोल ,डिझेल,नैसर्गिक वायू,खते,अन्नधान्य,सोने,अलुमियम यांचे काही घटक आयात करावे लागत असल्यामुळे यांचे दर गणनाला भिडले मात्र श्रीगोंद्यात १० रु कांद्याची गोणी २५ रु झाली तसेच इतर प्लस्टिकच्या व रबर वस्तूचे दर वाढले म्हणजेच ज्या वस्तू भारतात महाराष्ट्रात तयार होतात. अश्या वस्त्यूचे दर वाढण्याचे कोणतेही कारण नसताना व्यापारी वर्गाने दरवाढ करून व्यापारी वर्ग अक्षरश शेतकऱ्यांना खुलेआम लुटत आहेत .

युद्धाचा बहाणा की बाजाराचा खेळ? शेती साहित्य महागाई जगाच्या पटलावर अमेरिका–इराण तणाव उसळला, आणि गावाच्या शिवारात दर उसळले हा योगायोग नाही, ही साखळी आहे.वरती युद्ध, खाली महागाई ही ओळ आज शेतकऱ्याच्या हिशेबात रक्तासारखी उतरते आहे

# वन्यजीवांची संख्या मोजणारे अत्याधुनिक उपकरण विकसित

### युवा शास्त्रज्ञ रणजीत राऊत यासह मराठवाड्यातील संशोधकांना यश !

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**माहिजळगाव** : मराठवाड्यातील संशोधकांनी वन्यजीव संवर्धन आणि जैवविविधता अभ्यासाच्या दृष्टीने एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि क्रांतिकारी पाऊल उचलले आहे. जंगलातील प्राणी आणि त्यांच्या प्रजातींची अचूक संख्या मोजण्यासाठी या संशोधकांनी एका अत्याधुनिक उपकरणाची निर्मिती केली असून, या अभिनव संशोधनाला भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून अधिकृत पेटंट मंजूर करण्यात आले आहे. या घवघवीत यशामुळे ग्रामीण व निमशहरी भागातील संशोधन क्षमतेला नवे बळ मिळाले असून, संपूर्ण देशभरातून या चमूचे कौतुक होत आहे.

संशोधकांनी विकसित केलेले हे उपकरण निमल स्पेसीज पॉप्युलेशन ट्रॅकिंग डिव्हाइस या नावाने नोंदणीकृत करण्यात आले आहे. या उपकरणाची नोंदणी ७ जानेवारी २०२६ रोजी करण्यात आली होती, तर नुकतेच १६ एप्रिल २०२६ रोजी भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून या उपकरणासाठीचे अधिकृत प्रमाणपत्र (पेटंट) जारी करण्यात आले आहे.या महत्त्वपूर्ण संशोधनात अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील फक्राबाद येथील सुपुत्र व सध्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या अंबाजोगाई येथील योगेश्वरी महाविद्यालयातील प्राणीशास्त्र विभागाचे युवा शास्त्रज्ञ व संशोधक विद्यार्थी रणजित रावसाहेब राऊत यांनी प्रमुख भूमिका बजावली आहे.

त्यांच्यासोबतच त्यांचे संशोधन मार्गदर्शक तथा प्राणीशास्त्र विभागप्रमुख प्रा.डॉ.जी.डी.सूर्यवंशी, लोणी येथील पद्मश्री विखे पाटील महाविद्यालयाचे प्रा.डॉ.अनिल कुऱ्हे, संगमनेर महाविद्यालयाचे डॉ. रूपेंद्र भागडे, पाटोदा येथील वसंतदादा पाटील महाविद्यालयाचे प्राणीशास्त्र विभागप्रमुख प्रा.डॉ. प्रेमचंद सिरसट तसेच छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. रफिक झकारिया महिला महाविद्यालयाचे संशोधक विद्यार्थी योगेश बिडवे आणि अंकुश अंभोरे यांचा या संशोधन चमूमध्ये समावेश आहे.

# श्रीगोंदा भूमी अभिलेख कार्यालयावर नागरिकांचा रोष !

### मोजणीतील चुका, गैरवर्तन व 'देवाचे करा' संस्कृतीवर सवाल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : श्रीगोंदा भूमिअभिलेख कार्यालयात नेमकं चाललंय तरी काय ? अधिकारी कर्मचारी तसेच शिपाई यांच्यात सुसंवाद नसल्याचे चित्र पाहण्यास मिळत असून यामध्ये मोठ्या प्रमाणात नागरिकांची हेळसांड होताना दिसत आहे . त्यामुळे नागरीकातून मोठ्या प्रमाणात नाराजी व्यक्त केली जात आहे.

पूर्वी जुने लोक म्हणायचे कि जमिनीचा नकाशा चुकला की गावात वाद पेटतो ही जुनी म्हण इथे अक्षरशः खरी ठरतेय. तालुक्यातील भूमिअभिलेख कार्यालय आणि संबंधित कर्मचाऱ्यांच्या कारभाराबाबत नागरिकांमध्ये तीव्र नाराजी उसळली आहे. मोजणीच्या नकाशांमध्ये अक्षम्य चुका, मोजणीवेळी कर्मचाऱ्यांचे गैरवर्तन, आणि कार्यालयात अधिकाऱ्यांकडून नागरिकांना मिळणारी अपमानास्पद वागणूक या तक्रारी आता उघडपणे पुढे येत आहेत. श्रीगोंदा भूमिअभिलेख कार्यालयात नेमकं चाललंय तरी काय ? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अनेक गावांत जमीन मोजणीतील विसंगतीमुळे शेतकरी–शेतकरी, शेजारी–शेजारी वाद वाढले आहेत. रेषा कागदावर हलली, आणि नातेसंबंध तुटले, अशी स्थिती निर्माण झाली आहे. काही प्रकरणांत मोजणीच्या ठिकाणी नागरिकांशी उग्र भाषा वापरली गेल्याच्या तक्रारी आहेत.त्यामुळे नागरीकातून संताप व्यक्त केला जात आहे. तसेच कार्यालयातील स्थिती चिंताजनक असल्याचे नागरिक सांगतात. प्रमुख अधिकारी वारंवार गैरहजर असल्याने अर्जदारांना दाद कुणाकडे मागायची हा मोठा प्रश्न उभा राहिला आहे. कामासाठी येणाऱ्या नागरिकांना तासन्तास थांबवणे, उडवाउडवीची उत्तरे देणे, आणि शेवटी देवाचे करा असा सल्ला ही पद्धत अंगवळणी पडल्याचा आरोप आहे. दरम्यान, काही शिपाई 'अधिकृत दलाल' असल्याप्रमाणे वागत असल्याची चर्चा आहे. लक्ष्मी दिसली की काम झटपट, नाहीतर फाईल थंडअसा अनुभव अनेकांनी व्यक्त केला. वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या मोजण्यांमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक आणि मानसिक नुकसान होत असल्याचेही समोर आले आहे. १४ महिन्यापासून मोजन्या प्रलंबित श्रीगोंदा तालुक्यातील एका शेतकऱ्याने बोलताना सांगितले कि मी हद्दकायम मोजणी साठी पैसे भरलेले १४ महिने पूर्ण झाले आहेत. तरीही मोजणी मिळत नाही. त्यासाठी कार्यालयात चौकशी केली असता ते सांगतात कर्मचारी कमी आहेत. तारीख पडलेली नाही. आज साहेब सुट्टीवर आहेत. आज मोजणीदार सुट्टीवर आहेत

# देवधर्म व अध्यात्म हे विषय माणसाच्या मनाशी निगडित : नागवडे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव** : देवधर्म, अध्यात्म आणि विज्ञान या विषयावर जगामध्ये अनेक विचार मांडले जातात. सर्वसामान्य माणसापासून ते थोर विचारवंत या विषयावर आपले मत प्रगट करीत असतात. सामान्य माणूस साध्या शब्दांमध्ये वर्णन करतो. शिक्षित आणि विचारवंत तेच साधे वर्णन जड आणि गुढ शब्दामध्ये करतात. वेगवेगळ्या भाषा व इतिहासातील अन आकलनीय गोष्टी, पौराणिक कथा, ग्रंथ , लिखित किंवा अलिखित काही पुरावे व स्वतःचे तर्क वापरून, संदर्भ देत असतात. हे काम विशेषतः त्या त्या धर्मातील धर्मप्रमुख, धर्मप्रसारक व देवधर्माच्या नावावर उदरनिर्वाह करणारे तसेच राजकीय व सामाजिक सत्तेवर वर्चस्व ठेवू पाहणारे लोक करतात.: देवधर्म आणि अध्यात्म हे विषय माणसाच्या मनाशी निगडित असे विषय आहेत. माणसाने आपल्या मनावर नियंत्रण मिळवण्यासाठी केलेला खटाटोप आहे. असे मत थोर लेखक विचारवंत श्यामराव नागवडे यांनी व्यक्त केले.

पत्रकारांशी बोलताना नागवडे म्हणाले की, विज्ञान हे माणसाच्या मनाने शोधून काढलेले विश्वातील , पृथ्वीतलावरील,निसर्गातील, वातावरणातील सत्य गोष्टींवर केलेले संशोधन आहे. इथे देवधर्म, अध्यात्म हे श्रेष्ठ आहे. विज्ञान श्रेष्ठ आहे हा प्रश्न उचित नाही. दोन्ही गोष्टी माणसाच्या मनाने शोधलेल्या आहेत. देवधर्म व अध्यात्म ह्या गोष्टी साधारणता माणसाच्या भौतिक विकासाला व विज्ञानाला कमी लेखतात. देव धर्म आणि अध्यात्मा शिवाय विश्वात काहीच चालू शकत नाही अशीही धारण आहे. अनाधिकाला पासून तो आजपर्यंत मानवाने जी प्रगती साधली आहे ती सर्व विज्ञानावर आधारित आहे .हे कोणालाही नाकारता येणार नाही. एवढेच नव्हे तर सुमारे २५ लाख वर्षापूर्वी असलेल्या आदिमानवाच्या निसर्गामधील वास्तव्याचा पुरावा देखील विज्ञानान शोधून काढला आहे. देवधर्म आणि अध्यात्म ह्या संकल्पना कधी सुरू झाल्या त्यांचा विकास व त्यामधील बदल कसे कसे होत गेले त्याचा कालखंड किती होता इत्यादी गोष्टी वैज्ञानिक पद्धतीने सिद्ध करण्यात आल्या.

यावेळी बोलताना नागवडे पुढे म्हणाले की, देवधर्म व अध्यात्म हे माणसाच्या मनःशांती करता माणसानेच निर्माण केलेला कल्पनाविलास आहे. हा कल्पनाविलास खरा की खोटा हे जाने त्याने आपल्या स्वतःपुरते तपासलेले बरे राहील. ह्या गोष्टींना काही शास्त्रीय वैज्ञानिक आधार आहे का हा सुद्धा एक संशोधनाचा विषय आहे. एक वेळ देवधर्माअध्यात्म याशिवाय हे जग चालू शकेल पण विज्ञानाशिवाय माणसाचे एक पाऊलही पुढे पडणार नाही असे अनेकांचे मत आहे. मानवाची प्रगतीच मुळात विज्ञानावर आधारित संकल्पनांमुळे झाली आहे हे कोणीही नाकारू शकत नाही.

# चांभुर्डी येथे भगवान गौतम बुद्ध यांच्या मूर्तीची स्थापना

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**लिंपणगाव** : श्रीगोंदा तालुक्यातील चांभुर्डी येथे १ मे २०२६ रोजी म्हणजेच बुद्ध पौर्णिमेच्या दिवशी भंते डॉ.सुबोध बोधी यांचे हस्ते व भारतीय बौद्ध महासभा अहिल्यानगर दक्षिण जिल्हाध्यक्ष, त्यांची कार्यकारिणी, सर्व तालुका कार्यकारिणी, चांभुर्डी ग्रामशाखा,ग्रामस्थ यांचे उपस्थितीत भगवान बुद्ध मूर्तीची स्थापना करण्यात आली.

संध्याकाळी ६ वाजता भगवान गौतम बुद्धांच्या मूर्तीची भव्य अशी वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली होती. यावेळी समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मिरवणुकीनंतर नियोजित जागेवर भंते डॉ.सुबोध बोधी यांनी विधिवत पूजा करून सर्व मान्यवर व उपस्थित समाज बांधव यांचे समवेत मूर्ती स्थापन केली त्यावेळी भगवान बुद्ध व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या घोषणा दिल्या.

त्यानंतर सभास्थळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व इतर महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण केले. समता सैनिक दलाचे जवानांनी महापुरुषांना मानवंदना दिली.

**या पवित्र कार्यास धम्मबंधु संजय कांबळे, संस्थापक अध्यक्ष, तथागत बुद्धिष्ठ सोसायटी अहमदनगर यांनी भगवान गौतम बुद्ध यांची मूर्ती दान दिली.**

कार्यक्रमास सारोळा, कोरेगाव, कडूस, रांजणगाव, काष्टी, तसेच तालुक्याचे बाहेरील गावातून सुद्धा समाज बांधव उपस्थित होते.

शेवटी भारतीय बौद्धमहासभा दक्षिणेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र साळवे यांनी आभार मानले. त्या नंतर भजनाचा आस्वाद घेण्यात आला.

# शेवगावमध्ये अवैध धंद्यांचा विळखा ; घातक पदार्थांमुळे जीवितास धोका

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अमरापूर** : शेवगाव तालुक्यात अवैध धंद्यांनी पुन्हा डोके वर काढले असून, गुटखा, मावा, सुगंधी तंबाखू तसेच तरुणांमध्ये लोकप्रिय असलेल्या 'स्टिंग'सारख्या पेयांमुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असल्याची चिंता व्यक्त होत आहे. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे या घातक पदार्थांची विक्री खुलेआम सुरू असल्याचे चित्र आहे.

शेवगाव शहरासह परिसरात अनेक ठिकाणी नियमबाह्य पद्धतीने गुटखा व मावा विक्री होत असल्याचे नागरिक सांगतात. याशिवाय शाळा व महाविद्यालयांच्या परिसरातही

**वाढता धोका गुटखा, मावा विक्रीवर बंदी असतानाही खुलेआम व्यापार शाळा परिसरात अल्पवयीन मुलांना सहज उपलब्धता ऊर्जा पेयांच्या अतिसेवनामुळे आरोग्यावर परिणाम प्रशासनाच्या कारवाईचा अभाव**

अल्पवयीन मुलांना हे पदार्थ सहज उपलब्ध होत असल्याचे निदर्शनास येत आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुका येथे 'स्टिंग'सारख्या पेयाचे सेवन केल्यानंतर १२ वर्षांच्या मुलाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे पालकवर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, अशा पेयांच्या विक्रीवर नियंत्रण आणण्याची मागणी जोर धरत आहे.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, शेवगावमध्ये अवैध धंद्यांमध्ये मटका, जुगार, वाळूतस्करी यांसोबतच गुटखा व अन्य घातक पदार्थांची विक्री मोठ्या प्रमाणात सुरू आहे. संबंधित यंत्रणेकडून ठोस कारवाई होत नसल्याने हे प्रकार वाढीस लागले आहेत.

कारवाईची मागणी आरोग्यास घातक ठरणाऱ्या या पदार्थांवर तात्काळ बंदी घालून दोषींवर कडक कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. विशेषतः अल्पवयीन मुलांपर्यंत हे पदार्थ पोहोचू नयेत यासाठी कठोर उपाययोजना करण्याची गरज व्यक्त होत आहे.

दैनिक राष्ट्र सह्याद्री

बुधवार, दि.०६ मे २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

## प्रेयसीसोबत फिरणाऱ्या युवकाला मारहाण; नैराश्यातून आत्महत्या

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कर्जत** : गावच्या यात्रेत प्रेमसंबंध असलेल्या तरुणीसोबत फिरत असताना मुलीच्या नातेवाईकांनी मारहाण केल्याने नैराश्यात गेलेल्या युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना कर्जत तालुक्यात घडली. ओंकार सुभाष एकाड (वय २०, रा. खांडवी, ता. कर्जत) असे मृत युवकाचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शिंदा गावातील यात्रेत शनिवारी (दि. २ मे) ओंकार हा संबंधित तरुणीसोबत फिरताना मुलीच्या नातेवाईकांना दिसला. याचा राग आल्याने त्यांनी ओंकार यास शिवीगाळ करीत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यानंतर घरी नेऊन पुन्हा दमदाटी व मारहाण करण्यात आल्याचे समोर आले आहे. या घटनेनंतर ओंकार मानसिक तणावात होता. सोमवारी (दि. ४ मे) संध्याकाळी कर्जत बाजारतळ परिसरातील राहत्या खोलीत त्याने गळफास घेतल्याचे मित्राच्या निदर्शनास आले. माहिती मिळताच पोलीस उपअधीक्षक प्रवीण लोखंडे व पोलीस निरीक्षक सोपान शिरसाट यांनी घटनास्थळी भेट देत पंचनामा केला. याप्रकरणी सुभाष बलभीम एकाड यांच्या फिर्यादीवरून आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा कर्जत पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे. मुलीच्या सात ते आठ नातेवाईकांसह काही अज्ञात व्यक्तींवर गुन्हा नोंदवण्यात आला असून मुलीच्या वडिलांना अटक करण्यात आली आहे. इतर आरोपींचा शोध सुरू आहे. दरम्यान, सर्व आरोपींना अटक केल्याशिवाय मृतदेह ताब्यात घेणार नाही, अशी भूमिका नातेवाईकांनी घेतल्याने पोलीस ठाण्यात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

## कॅप्टन खरातला पाच दिवसांची पोलीस कोठडी



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : काल कॅप्टन अशोककुमार खरात यास शिर्डी पोलीसांनी ताब्यात घेत अटक केल्यानंतर आज राहाता न्यायालयात हजर केले असता त्यास पाच दिवसांची कोठडी देण्यात आली आहे. खरात यास शिर्डी येथील जमीन बळकावणे, सावकारकी आदी कलमा खालील गुन्ह्यात त्यास राहाता न्यायालयात हजर करण्यात आले होते.

मोठ्या फौज फाट्यात खरात यास दुपारी तिन च्या सुमारास उपविभागीय पोलिस अधिकारी अमोल भारती, पोलीस निरीक्षक रणजीत गलांडे, पोसई निवांत जाधव यांनी कोणतीही रिस्क नको म्हणून शेकडो पोलीसांच्या ताफ्यात त्यास हजर केले. खरात यास कोर्टात उभे केले असता दोनही पक्षाचे वकील व सरकारी वकील यांनी आपापले म्हणणे कोर्टासमोर मांडले.

पोलीसांनी आपली बाजू मांडताना आरोपी खरात याने शिर्डी परिसरात घेतलेल्या पाच एकर जमीन खरेदी केली. या खरेदीसाठी वापरण्यात येणारी बेहिशोबी सावकारकीचे व्यवहार तपासणी, तसेच या गुन्ह्यातील जमीनीची मालकीन तथा खरात ची पत्नी कल्पना खरात ही फरार असून तिला अटक करणे बाकी आहे.

त्यामुळे खरात कडून या गुन्ह्याची उकल करणे आवश्यक असून त्यास पोलीस कोठडी देण्याची मागणी केली असता न्यायालयाने त्यास ९ मे पर्यंत पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

### खरातने तीन शर्ट बदलले

कॅप्टन खरा इतिहास काल सहा वाजता नाशिक येथून शिर्डीत आणण्यात आले होते. त्यावेळी त्याचे अंगात पिवळसर काळेपट्टे असलेला फुल शर्ट अंगात होता. त्यानंतर त्यास पोलीस उपनिरीक्षक निवांत जाधव यांच्या केबिनमध्ये एक तासात आल्यानंतर त्याच्या अंगात नवा कोरा पिवळ्या रंगाचा टी-शर्ट होता तर आज दुपारी त्यास न्यायालयात हजर केले असता त्याच्या अंगात गुलाबी कलरचा टी-शर्ट होता.

### प्रतिभा चाकणकर पिंक मध्येच

कॅप्टन खरात प्रकरणांमध्ये ज्यावेळी रूपाली चाकणकर यांच्या भगिनी प्रतिभा यांना शिर्डी पोलिसांनी चौकशीसाठी बोलावले त्यावेळी त्यांनी गुलाबी रंगाची साडी मैत्रिण गुलाबी रंगाच्या साडीत वकीलही गुलाबी रंगाच्या ड्रेसमध्ये आज पुन्हा कॅप्टन खरात कोर्टात जाताना गुलाबी टी-शर्ट वर आल्याने गुलाबी रंगाचे गुढ वाढले आहे.

## चोरीच्या गुन्ह्यातील बंटी बबली राहुरी पोलिसांकडून २४ तासात अटक



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील वांबोरी येथील सुलोचना पांडुरंग देशमाने वय ७६ यांनी दिलेल्या फिर्यादीवरून राहुरी पोलीसात गुन्हा रजिस्टर नंबर ४०७/२०२६ बी एन एस कलम ३०५,३३१-४ प्रमाणे दिनांक ४ मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदरच्या गुन्ह्यातील आरोपींचा राहुरी पोलिसांनी कसून शोध घेत असता या गुन्ह्यातील आरोपी १) प्रकाश पंढरीनाथ ढवळे व त्याची पत्नी २) कल्पना प्रकाश ढवळे दोघे राहणार उल्हासनगर जिल्हा ठाणे हे गुन्हा करून पळून जाण्याच्या तयारीत असताना नेवासा फाटा येथून राहुरी पोलिसांनी तात्काळ ताब्यात घेऊन सदरील गुन्ह्यात त्यांना अटक केली आहे. सदरील गुन्हा फिल्म आरोपी बंटी बबली यांना पोलिसांनी अटक करून राहुरी न्यायालयात हजर करण्यात आले होते. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर तसेच राहुरीचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस हेड कॉन्स्टेबल अशोक झिने , पोलीस नाईक अशोक कुदळे, महिला पोलीस कॉन्स्टेबल शिवानी गायकवाड पोलीस कॉन्स्टेबल पठाण चांद यांच्या पथकाने ही कामगिरी केली आहे.

## अल्पवयीन मुलीस पळवून नेल्याप्रकरणी पोलिसात गुन्हा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : राहुरी शहरातील एका अल्पवयीन मुलीला फूस लावून तीला पळवून नेल्याची घटना दि. २९ एप्रिल रोजी दुपारच्या सुमारास घडली. या घटने बाबत राहुरी पोलीस ठाण्यात अपहरचा गुन्हा दाखल करण्यात आला. एक १७ वर्षे १० महिने वय असलेली अल्पवयीन मुलगी तीच्या कुटुंबासह राहुरी शहर हद्दीत राहते. दि. २९ एप्रिल २०२६ रोजी सकाळी पिडीत मुलगी घरी असताना तीचे वडील बाहेर गेले होते. दुपारी १२ वाजेचे सुमारास वडिलांनी मुलीला फोन केला व तु कुठं आहे असे विचारले असता तिना सांगितले की, मी मुळा डॅम येथे आले आहे. तेव्हा तु घरी लवकर जा असे वडिलांनी तीला सांगितले. त्यानंतर वडिलांनी सायंकाळी ४ वाजेचे सुमारास पुन्हा मुलीला फोन केला असता तिचा फोन बंद होता. त्यानंतर वडिल सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास घरी गेले. तेव्हा त्यांची मुलगी घरी आलेली नव्हती. वडिलांनी तीला पून्हा फोन केला असता तिचा फोन बंद होता. तेव्हा नातेवाईकांनी मुलीचा परिसरात शोध घेतला असता ती मिळुन आली नाही. तेव्हा नातेवाईकांची खात्री झाली कि, त्यांच्या मुलीला कोणीतरी आज्ञात व्यक्तीने कशाचे तरी आमीष दाखवुन फूस लावुन पळवुन नेले आहे. त्यानंतर पिडीत मुलीच्या वडिलांनी राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्या फिर्यादीवरून अज्ञात आरोपी विरोधात अपहरणचा गुन्हा दाखल करण्यात आला. पुढिल तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनात सहाय्यक फौजदार तुळशीदास गिते हे करीत आहे.

## ब्राह्मण सेवा संघ, केडगावकडून राज्यभरात विक्रमी २२ सामुदायिक व्रतबंध सोहळे संपन्न



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : ब्राह्मण समाजातील अत्यंत महत्त्वाचा समजला जाणारा व्रतबंध (उपनयन संस्कार/मुंज) हा संस्कार ब्राह्मण सेवा संघ, केडगाव यांच्या वतीने यंदा संपूर्ण महाराष्ट्रात विक्रमी पातळीवर पार पडला. दि. ३ मे २०२६ रोजी एकाच दिवशी सुमारे २२ सामुदायिक व्रतबंध सोहळ्यांचे आयोजन करून संघटनेने एक उल्लेखनीय विक्रम नोंदविला आहे.

व्रतबंध हा मुलाच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा मानला जातो. शिक्षणासाठी गुरुगृही पाठवण्यापूर्वी हा संस्कार करण्याची परंपरा असून त्याला धार्मिक व सांस्कृतिक दृष्ट्या विशेष महत्त्व आहे. आधुनिक काळातील धावपळ, वेळेची कमतरता आणि वाढते आर्थिक ओझे लक्षात घेता, सामुदायिक पद्धतीने हा संस्कार करण्याची संकल्पना अधिक उपयुक्त ठरत असल्याचे यावेळी अधोरेखित झाले. ब्राह्मण सेवा संघ, केडगावतर्फे गेल्या तब्बल २८ वर्षांपासून सातत्याने सामुदायिक व्रतबंध सोहळ्यांचे आयोजन करण्यात येत आहे. विशेष म्हणजे, ज्यांची आर्थिक परिस्थिती प्रतिकूल आहे अशा कुटुंबांतील मुलांचे व्रतबंध मोफत करून समाजाभिमुख कार्याचा आदर्श संघटनेने जपला आहे. याबाबत माहिती देताना संघाचे अध्यक्ष श्री. नंदकुमार पोळ यांनी सांगितले की, समाजातील प्रत्येक घटकाला धार्मिक संस्काराची संधी मिळावी, हा आमचा मुख्य उद्देश आहे. या भव्य सोहळ्याचे पौरहित्य वेदमूर्ती पंढरपूरकर गुरुजी यांनी केले.

त्यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विधी शास्त्रोक्त पद्धतीने पार पडले. सोहळ्याचा एक विशेष आकर्षण म्हणजे सर्व बटूंची पारंपरिक वेशभूषेत वाजतगाजत काढण्यात आलेली मिरवणूक, ज्यामुळे परिसरात उत्सवी वातावरण निर्माण झाले. याच कार्यक्रमात नुकत्याच झालेल्या ऋग्वेद कंठस्थ परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून शृंगेरी पीठाच्या शंकराचार्यांकडून सन्मानित झालेल्या श्री. वेदांत कुलकर्णी (पंढरपूरकर) यांचा विशेष सत्कार करण्यात आला. ते गेल्या चौदा वर्षांपासून आबासाहेब पटवर्धन वेदशास्त्र विदयालय,पुणे येथे वेदाचार्यश्रीपादशास्त्री धायगुडे यांच्या मार्गदर्शनाखाली अध्यापन करत आहेत. विशेष म्हणजे पुरस्कारार्थी श्री वेदांत हे वेदमूर्ती श्री. पंढरपूरकर गुरुजी यांचे चिरंजीव आहेत, ही बाब उपस्थितांसाठी अभिमानास्पद ठरली. कार्यक्रमाला विविध मान्यवरांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.

यामध्ये मा. आमदार संग्रामभैय्या जगताप, श्री. सचिनजी जगताप, नगरसेवक श्री. अमोल येवले, नगरसेवक श्री. विजय पठारे, सौ. प्रियाताई जानवे, श्री. विवेक नाईक आणि श्री. योगेश दाणी यांचा समावेश होता. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अनेक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. यामध्ये डॉ. श्रीकृष्ण जोशी, ज्ञानेश देशपांडे, प्रशांत देशपांडे, आनंद ठिपसे, दिलीप इनामदार, पंकज जहागीरदार, नितीन क्षीरसागर, धनंजय जामगांवकर, मिलिंद वडाळकर, डॉ. सुधीर कुलकर्णी, विनायक कुलकर्णी, नंदकुमार कुलकर्णी, राजेश कळसे, अजित कुलकर्णी, किरण कुलकर्णी, राहुल पांडव, गिरीश क्षीरसागर, योगी क्षीरसागर, किरण खुर्जे कर तसेच तेजस्विनी महिला ग्रुप यांचा विशेष उल्लेख करण्यात आला.

एकूणच, ब्राह्मण सेवा संघ, केडगाव यांच्या या उपक्रमामुळे पारंपरिक संस्कार जपत समाजातील सर्व स्तरांपर्यंत धार्मिक विधी पोहोचवण्याचे कार्य प्रभावीपणे घडून आले असून, हा उपक्रम इतरांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे.

## शिर्डी नगरपालिकेच्या वतीने उद्या थकीत करधारकांच्या मालमत्ता लिलाव

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : शिर्डी नगरपालिका हद्दीत असणाऱ्या मालमत्ताधारकांवर असणारे थकीत करांबाबत शिर्डी नगरपालिकेने मोठी मोहीम हाती घेतली असून उद्या दि. ७ मे रोजी थकीत करदात्यांच्या मालमत्तांचा लिलाव होणार आहे. त्यामुळे अनेक थकबाकीदारांचे धाबे दणाणले असून उद्याचा लिलाव झाल्यास मालमत्ता धारकावर मोठी कुऱ्हाड कोसळणार आहे. सदर मालमत्ता जप्तीसाठी नगरपालिकेने तब्बल ११२ मालमत्ता धारकांना नोटीस बजावण्यात आली आहे.

त्यात म्हटले आहे की, महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५ चे कलम जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांचेकडील दि १३ एप्रिल २०२६ आदेशान्वये शिर्डी नगरपरिषद हद्दीतील खालील तक्त्यात नमूद मालमत्ता धारकांना / भोगवटदारांना वेळोवेळी तगादे करुन व मागणी नोटीस बजावूनही मालमत्ता कर भरलेला नाही, याकारणास्तव सदर मालमत्तांचा जाहिर लिलाव करणेबाबत आदेशीत केलेले आहे.

त्यानुसार जप्त केलेल्या मालमत्तांचा जाहिर लिलाव शिर्डी नगरपरिषद कार्यालयात करनिर्धारण विभागामध्ये दि.०७ मे २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता ठेवण्यात आला आहे.

### सदर प्रक्रिया माहित नाही : निलेश कोते

या लिलावाबाबत माजी उपनगराध्यक्ष व विद्यमान नगरसेवक निलेश कोते यांना याविषयी विचारले असता त्यांनी आपल्याकडे कोणती माहिती नसून मला माहिती घेऊनच बोलावं लागेल मला याबाबतची कोणतीही कल्पना नाही असे वक्तव्य होते यांनी केले .

### ही कायदेशीर प्रक्रिया : अभय शेळके

शिर्डीच्या विकासासाठी नगरपरिषद कटिबद्ध असून शहराचा विकास हा मालमत्ता धारकांच्या करातूनच होत असतो नागरिकांना रस्ते वीज पाणी या मूलभूत गरजा भागवणे कामे मालमत्ता धारकांनी आपले विविध कर हे वेळोवेळी नगरपालिकेत भरणे गरजेचे असते त्या करावरच नगरपालिकेचे प्रशासन चालते जर वारंवार त्यांना सांगूनही ते प्रशासनाला सहकार्य करत नसेल तर कायदेशीर प्रक्रिया राबवावी लागते असे मत उपनगराध्यक्ष अभय शेळके यांनी व्यक्त केले.

## गटनेता म्हणून बहुमत सिद्ध करा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कर्जत** : गटनेता म्हणून राहायचे असल्यास आपले बहुमत सिद्ध करा असा अल्टीमेटम जिल्हाधिकारी डॉ पंकज आशिया यांनी कर्जत नगरपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांना दिला. मागील पंधरा दिवसांपासून कर्जत नगरपंचायतीचा अधिकृत गटनेता कोण ? याचा फैसला आता गुरुवार, दि ७ रोजी होणार आहे.

मंगळवारी पुन्हा एकदा जिल्हाधिकारी कार्यालयात कर्जतच्या मोजक्या नगरसेवकांनी हजेरी लावत गटनेता बदलाबाबत आपली भूमिका जाहीर केली. कर्जत नगरपंचायतीचे गटनेते संतोष मेहेत्रे आणि उपगटनेते सतीश पाटील यांचा अधिकारावरून वाद उफाळला असून मेहेत्रे कोणत्याही नगरसेवकांस विश्वासात न घेता आपला कारभार पाहत असल्याने ९ नगरसेवकांनी २४ रोजी जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांच्याकडे गटनेता बदलाबाबत आपली भूमिका आणि प्रस्ताव सह्यासह दाखल केला.

यावर जिल्हाधिकारी आशिया यांनी २९ एप्रिल रोजी सर्व १५ नगरसेवकांना अहिल्यानगर येथे हजर राहण्याच्या सूचना दिल्या होत्या. २९ रोजी विद्यमान गटनेते संतोष मेहेत्रे यांनी उपगटनेते पाटील यांनी दाखल केलेला प्रस्तावाची माहिती घेत त्यादृष्टीने कायदेशीर बाबींचा अभ्यास करण्यासाठी वेळ मागितला होता.

त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनी ५ दिवसांचा वेळ देत मंगळवार, दि ५ रोजी पुन्हा १५ नगरसेवकांना आपली भूमिका मांडण्यासाठी बैठक बोलावली होती. आजच्या बैठकीत पुन्हा मागील ९ नगरसेवकांनी आपली भूमिका ठाम असून गटनेते संतोष मेहेत्रे यांना सदरच्या पदावरून दूर करण्याची मागणी कायम ठेवली.

दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर जिल्हाधिकारी आशिया यांनी ज्या पदाधिकाऱ्यांस गटनेता म्हणून आपले पद शाबूत ठेवायचे आहे त्याने गुरुवार, दि ७ मे रोजी आपले बहुमत सिद्ध करावे असा अल्टीमेटम दिला असल्याची माहिती एका नगरसेवकांने नाव न छापण्याच्या अटीवर दिली. त्यानुसार कर्जतचा गटनेता कोण ? याचा फैसला आता गुरुवारी होणार असून याकडे कर्जत तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## हद्दपार आरोपीला वाळू चोरी करताना रंगेहाथ पकडले



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : अहिल्या नगर जिल्ह्यातुन हद्दपार असलेल्या राहुरी पोलीस हद्दीत येऊन विना नंबर प्लेट डंपर ने वाळू चोरी करताना निखिल बबन लाटे हाआरोपी राहुरी पोलिसांना रंगेहाथ सापडल्याने त्याच्याकडून सुमारे ३२ लाख रुपयांचा मुद्देमाल (हायवा व वाळू) जप्त करून त्या आरोपीला ताब्यात घेऊन मुंबई पोलीस १४२ व बीएनस कायद्याप्रमाणे प्रमाणे कारवाई करण्यात आली.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर तसेच राहुरीचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांचे मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक गणेश वाघमारे, पोलीस हेड कॉन्स्टेबल सुरज गायकवाड , सतीश आवारे, यांनी केली आहे.

## पत्नी व सासूच्या मारहाणीत तरुणाचा मृत्यू



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : किरकोळ वादातून पत्नी व सासूने दगड तसेच लाथाबुक्क्यांनी केलेल्या मारहाणीत एका तरुणाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना राहुरी तालुक्यातील बारागाव नांदूर येथे शनिवारी (दि. ३ मे) रात्री घडली. शिवाजी सदू पवार (वय ३७, रा. बारागाव नांदूर, ता. राहुरी) असे मृत तरुणाचे नाव आहे.

याप्रकरणी पत्नी सुरेखा शिवाजी पवार व सासू सिताबाई मुरलीधर बर्डे या मायलेकीविरुद्ध राहुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत चांगदेव सदू पवार यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार, मयत शिवाजी पवार हा फिर्यादीचा मोठा भाऊ असून तो पत्नी व सासूसह बारागाव नांदूर येथे राहत होता. पत्नी व सासू या दोघी किरकोळ कारणांवरून नेहमी त्याच्याशी वाद घालून मारहाण व शिवीगाळ करत असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. दि. ३ मे रोजी रात्री सुमारे ११ वाजता शिवाजी पवार यास सेंट्रल बँकेसमोर पत्नी व सासूने मारहाण केल्याची माहिती चांगदेव पवार यांना मिळाली. त्यानंतर ते घटनास्थळी पोहोचले असता शिवाजी पवार बेशुद्ध अवस्थेत पडलेले होते.

त्यांच्या डोक्यातून रक्त येत होते तसेच जवळच दगड पडलेला होता. घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आल्यानंतर जखमी शिवाजी पवार यांना तातडीने राहुरी ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले. त्यानंतर मृतदेहाचे शवविच्छेदन अहिल्यानगर येथील ग्रामीण रुग्णालयात करण्यात आले. चांगदेव पवार यांच्या फिर्यादीवरून राहुरी पोलिस ठाण्यात गुन्हा रजि. नं. ४६१/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम १०५, ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## बोगस खरीदीखत प्रकरणी नेवासा येथे सहा जणांवर गुन्हा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : येथील दुय्यम निबंधक कार्यालयामध्ये खोटे खरेदीखत दस्त नोंदवून या खरेदी दस्तामध्ये जमीन नावे असलेली महिला ही आपणच असल्याचे भासवून जमीनीची विक्री केल्याप्रकरणी नेवासे पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरुन सहा जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अधिक सविस्तर वृत्त असे की संजय रावसाहेब पटारे ऊर्फ पठाडे (वय ३७) यांनी नेवासे पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले की, ३० सप्टेंबर २०२४ रोजी दुय्यम निबंधक नेवासे यांच्याकडे खरेदी खत दस्त नं. ५९१०/२०२४ चे खोटे खरेदीखत दस्त नोंदवून सदर खरेदी खतामध्ये कांताबाई विनायक पटारे उर्फ पठाडे हिने मीच चंद्रभागा विनायक पटारे उर्फ पठाडे असल्याचे भासवून खोटी कागदपत्रे सादर करुन मयत महिला चंद्रभागा विनायक पटारे उर्फ पठाडे यांचे नावे असलेली शेत गट नं. ८६ मधील पाऊणे दोन एकर (०.७२ आर) या शेतजमीन मिळकतीची स्वतःच्या फायद्यासाठी परस्पर विक्री केलेली आहे.

कांताबाई विनायक पटारे उर्फ पठाडे,बाबासाहेब विनायक पटारे उर्फ पठाडे,चंद्रभान विनायक पटारे उर्फ पठाडे तिघे रा.धामोरी ता.नेवासा तसेच यशोदा भाऊसाहेब शेळके रा.आरडगाव ता.राहुरी,हिराबाई राम वाघ रा. नारायणवाडी ता.नेवासा व कमलबाई विश्वनाथ म्हस्के रा. जेऊर हैबती यांनी स्वतःच्या फायद्याकरिता संगनमत करुन बनावट कागदपत्रे सादर करुन फसवणूक केल्याप्रकरणी दिलेल्या फिर्यादीवरुन वरील ६ जणांवर नेवासा पोलीस ठाण्यात गुन्हा नंबर ३२९ दि.२९/ ४/ २०२६ नुसार भारतीय न्याय संहिता कलम ३१८ (४,),३३६(३),३३८ नुसार बनावट खरी खत केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

नेवासे पोलीस ठाण्यात जमीन खरेदी - विक्री प्रकरणी जमीन खरेदी करून देणारी महिला खरेदी घेणाऱ्या तीन महिला व दोन साक्षीदार यांच्यावर नेवासे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.